
# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ अंक क्र ५ व ६

## : महान संदेश :

सर्व राष्ट्रांना व जनतेला संदेश सांगा, की पुनर्जन्माचा काल आता आला आहे व आपण सर्वजण तो जाणू शकू परमेश्वराच्या प्रेमाचे प्रकटीकरणाचा काळ आता आला आहे.आपणास परमेश्वराची आनंदाची बासरी वाजवावी लागेल.आपण पुर्णावस्थेत यावे याचीच मी धडपड करीत आहे. ही नांव आपण पुर्ण स्वतंत्रता व सुज्ञता बाळगून वल्हावयाची आहे. आपण वादळ,तुफान, वावटळ यांना घाबरायाचे नाही.तुमचे उद्दीष्ट दुसऱ्या तीरावर नाव न्यावयाची आहे.

– श्री माताजी

## : स्वतंत्रता :

संपूर्ण अहंपणाविरहीत हे अतिसूक्ष्मतेचे स्वातंत्र्याचे लक्षण आहे.तेथे अडथळे नसतात.पण बासरीसारखी पोकळेपण, ज्यामुळे आपण परमेश्वराचे आनंदी गाणे गाऊ शकु हीच ती संपूर्ण स्वतंत्रता असते. स्वतंत्रता म्हणजे तुमच्या अंगात असणाऱ्या सर्व शक्ति तुम्हास मिळणे आपल्या मध्य मज्जातंतूवर, देहभानाच्या मनावर, आपणास आत्म्याची जाणीव होणे म्हणजेच स्वतंत्रता.

– श्री माताजी

## : अप्रतीम भांडार :

मी आपणास भांडाराची किल्ली दिली.ती दुसऱ्या कोणाजवळ नाही.पण तुम्हाला ते उघडता यावयास हवे.आपणास एव्हढे देऊन ही रिकाम्या हाताने जावयाचे आहे कां? एखाद्यानी फुकट बढाई कां मारावी? आपण जे करतो ते सर्व परमेश्वरी शक्तीमुळे होत असते याची ओळख हवी. तीच आदिशक्तिची कार्य पध्दती आपण त्या चमत्काराचे नुसते साक्षीदार असतो. ती स्थिती मिळण्याकरीता आपण प्रार्थना करावयास हवी, की '' आमची 'अहं' ची बाधा'' दूर होवो.तसेच आपण सर्व मोठ्या वस्तुचे लहान भाग आहोत.ही भावना प्रगल्भ होवो.म्हणजे परमेश्वराचे आशीर्वाद मिळवण्याचे प्रतिबिंब सर्व अणु रेणूमध्ये पसरो. हा जिवंत प्रवाह आनंदात.सर्व मानवांत पसरो. त्याचा सर्वावार प्रकाश पडो.आपल्या हृदयात प्रेमाचा झरा पसरो. प्रेम हे अमर्याद असते. आपले लक्ष हे भौतिक गोष्टीवर स्थिर असते. पण आपण आत्म्याच्या गोष्टी करतो.आपले लक्ष आत्म्यांत विलीन व्हावयास हवे म्हणजेच आपणास चिरानंद मिळतो.

– श्री माताजी

# सहस्त्रार दिवसाची पूजा

(परमपूज्य माताजींच्या ५-५-१९८२ रोजी लारेन्सी, फ्रान्स येथे केलेल्या उपदेशाचा अनुवाद)

हा दिवस आपणा सर्व साधकांचे दृष्टीने फार महान आहे. या दिवशी शेवटचे ईश्वरीय कार्य, म्हणजे विराटाचे शेवटचे चक्र उघडण्याचे कार्य, ५ मे १९७० रोजी केले गेले. विश्वातील अध्यात्मिक घटनांमधील हा सर्वात महान प्रसंग आहे.हा अतिशय काळजीपूर्वक व (Adjustment) करुन घडवून आणला होता. स्वर्गात कशा तऱ्हेने कार्य होते हे समजण्याची कुवत मानवी बुध्दीत नाही. तुमच्या सुदैवामुळे व ईश्वराच्या तुमच्यावरील प्रेमामुळेच हा चमत्कृती पूर्ण चमत्कार घडून आला. ह्या घटनेशीवाय लोकांना सामूहिकरित्या कुंडलिनी जागृती देणे शक्य झाले नसते. एक दोन लोकांना देता आली असती, पण सामूहिकरित्या इतक्या प्रचंड संख्येनी जागृती देणे शक्य झाले नसते.तुम्हाला माहीती आहे की, सहस्त्रारामधे सात मुख्य चक्रांची पीठे आहेत. त्याच्या १००० नाड्या आहेत.किंवा त्याला ज्योती म्हणता येईल, व त्या प्रत्येकाच्या १६००० शक्त्या आहेत.प्रत्येक नाडी एका व्यक्तिशी संबंध ठेवते. व अशा तऱ्हेने नाड्यांचे (Permutation Combination) करुन एकाला दुसरे असे प्रत्येक वेळी निराळे धरून मानवाचे संगोपन केले जाते. विराटाचे सहस्त्रार चक्र उघडताच, सर्व वातावरण (Tremendous) प्रचंड चैतन्याने भरुन गेले, आकाशात अतिशय (Tremendous) तेजस्वी प्रकाश पसरला व हे सर्व अति मुसळधार पावसासारखे किंवा धबधब्यासारखे पृथ्वीवर आले. इतक्या जोरात आले की जणू काही मीच भांवावून गेले.ही घटना इतकी महान, इतकी अनपेक्षित होती की मीच आश्चर्यचकित झाले व ते सर्व वैभव बघून संपूर्ण शांत झाले. आदि कुंडलिनी अशी दृष्टोत्पत्तीस आली की एखाद्या भट्टी सारखी ती भट्टी निरामय शांत होती, पण एखाद्य पेटलेल्या भट्टीसारखे तिचे रुप होते.तुम्ही एखादा धातू खूप गरम करावा व त्यात अनेक रंग दिसावेत, तशी आदि कुंडलिनी एखादया भट्टीसारखी दिसली. तुम्ही कोळशावर चालणाऱ्या वीज निर्माण करण्याच्या भट्ट्या पाहिल्या असतील. आणि एकामागून एक ती वर-वर येत होती.व उंच-उंच (Shoot-Shoot) जात होती सर्व देवता आल्या व आपापल्या सोन्यांच्या आसनावर आरुढ झाल्या.मग त्यांनी घुमटाच्या आकाराचा वरचा भाग उचलून उघडला, त्यानंतर त्या मुसळधार पावसाने मला भिजवून टाकले.ते सर्व मी पाहिले व आनंदाने स्वतःलाच विसरुन गेले. एखादया कलाकाराने स्वतःची कलाकृती बघावी, असा कृतकृत्यतेचा आनंद मला झाला.या सर्व आनंदातून बाहेर आल्यावर माणसे मला इतकी आंधळ्यासारखी दिसली की मी शांत बसून राहिले व इच्छा केली की हे अमृत ओतण्यासाठी कप मिळविले पाहिजे, दगड नसावेत.

सहस्त्रार हा तुमच्या शरीराचा सर्वात सुंदर भाग आहे.हे एक हजार निरनिराळ्या रंगाच्या पाकळ्या असलेले एक सुंदर कमळ आहे. पाकळ्या मोठ्या झालेल्या ज्योती सारख्या दिसतात. बऱ्याच लोकांनी हे पाहिले आहे.पण व्हायब्रेशनचा मुसळधार पाऊस पाडणारे ह्याच्या ज्योती कारंज्या एवढ्या मोठ्या रंग व सुवासाच्या कारंज्यासारख्या असतील असे कोणासच वाटले नाही. अशा एखादया फुलाची कल्पना करा. ज्याच्यातून रंग व सुवासाची उधळण होत आहे. लोकांनी सहस्त्राराबद्दल फारच थोडे लिहीले आहे.पण जे काही त्यांनी पाहिले ते बाहेरच्या बाजूचे होते. आतील बाजू पाहणे त्यांना जमले नाही, आतुन जरी तुम्ही पोहोचलात तरी जर संपूर्ण सहस्त्रार उघडले नसेल तर, त्याचे सौंदर्य तुम्हाला पहाता येणार नाही. कारण जेव्हा ते बंद असते तेव्हा बारीकशा छिद्रातून

तुम्ही बाहेर निघून जाता.पण कल्पना करा एक हजार मोठमोठ्या पाकळ्यांचे एक प्रचंड कमळ आहे., आणि त्याच्यात अगदी मध्यभागी तुम्ही बसलेले आहात.व त्या सर्व सुंदर पाकळ्यांकडे बघता आहात.सर्व अतिशय सुंदर व रंगबेरंगी आहे , सुगंधी आहे व आत्मिक आनंदाने ते स्पंदित होत आहे.या स्थितीमध्ये रहाणे हे आदर्शभूत आहे पण त्या निरामय शांततेनंतर तुमचे हृदय करुणा व प्रेम यांनी भरुन जाते , व त्यामुळे तुम्ही इतरांकडे खेचले जाता. ज्यांना दृष्टी असणे म्हणजे काय , हे माहित नाही.त्यानंतर तुमचे चित्त लोकांच्या सहस्त्राराकडे जाते व तुम्हाला सहस्त्रारात असलेले प्रश्न दिसू लागतात.सहस्त्रार उघडावे असे जरी तुम्हाला वाटले तरी ते फार अवघड आहे , कारण ईश्वराला मानवात आणायचे कार्य मानवामधूनच झाले पाहिजे. (Channeling of the Divine has to be through human being) तुमच्याकडे शक्ती असेल पण ती माणसांमधूनच प्रवाहीत करायची असते ना ! माझ्या संपुर्ण आयुष्यात साक्षात्कारी लोक फार माहित नव्हते. त्यांना कसे आणायचे हे सर्व कसे घडवून आणायचे , हे प्रश्न होते. मग मी लोकांना शोधायला सुरूवात केली प्रथम मला ७० वर्षाची एक वृध्द स्त्री भेटली.कोणत्या तरी साध्या भौतिक कारणामुळे ती रागावली होती. मला भेटल्यावर तिला शांति लाभली. तिचे सहस्त्रार अगदी विरून गेले होते. माझ्या बरोबर असली ती , आत्म्याचे सोडून भलतेच विचार करायची.व तिचा मेंदू ढगांनी व अंधःकाराने झाकला जायचा.पुन्हा पुन्हा मला तो प्रकाशित करावा लागायचा पण तिला जागृती मिळाली नाही. सुरवातीला माझ्याकडे येणारे बहूतेक लोक रोग निवारणासाठीच यायचेमाझ्याकडे ती शक्ती लहाणपणापासुनच होती. व या पूर्वीच मी काही थोड्या लोकांना जागृती दिली होती. पण त्यांना त्याबद्दल अगदी खऱ्या अर्थाने तळमळ वाटणे आवश्यक असायचे पण त्या क्वालिटीचा एकही माणूस मला भेटला नाही. कारण मी काही जंगलात रहात नव्हते. सर्व साधारण माणसासारखी सामान्य लोकातच रहात होते. त्यांना इतकी जबरदस्त इच्छा (अर्थ) नसायची. आणि मला त्यांच्यातच कार्य करायचे होते. त्यांना खरे जग जे आहे व ज्या खोट्या जगात ते रहात आहेत. त्याबद्दल कसे सांगायचे. ज्या स्त्रीला प्रथम जागृती मिळाली , तिला काही मिळवायची , ' काही साधना करायची फारच तीव्र इच्छा होती. तिने प्रयत्न केला तिचे बाबतीत घडून आले. पण ती काही फार आनंदाचा दिसत नव्हता. कारण वैयक्तिकरित्या जगृती मिळणाऱ्या पैकीच ती एक होती.त्या महान घटनेनंतर बऱ्याच लोकांना जगृती मिळावयास हवी होती. १९७० साली आम्ही बोर्डी येथे कार्यक्रम ठेवला. संध्याकाळी एका गृहस्थाला जागृती मिळाली. दुसऱ्या दिवशी विरोधी शक्तिंनी आपले कार्य करायला सकाळीच सुरवात केली. व्हायब्रेशन्स बिघडू लागल्याचे मला वातावरणातुन दिसून आले. मग संध्याकाळी मी अतिशय कडक भूमिका घेतली व सगळ्यांना अतिशय रागावले.त्यापुर्वी मी कधीच इतकी रागावले नव्हते. आश्चर्य म्हणजे बारा लोक पार झाले.तो फारच महान क्षण होता. मग एक एक करुन बरेच लोक पार झाले. तिघांना परतीच्या प्रवासात गाडीत जागृती मिळाली. एकदमच त्यांना चैतन्य लहरी प्राप्त झाल्या. अशा तऱ्हेने सामुहिक उत्क्रांतिची सुरुवात झाली.

सहस्त्रार म्हणजे तुमची चेतना प्रकाशित होते तेव्हा तुम्ही ईश्वरी कार्य पध्दतीत जाता. दोन प्रकारच्या पध्दती आहेत. एक ईश्वरी पध्दत व दुसरी तुमची पध्दत तुम्ही ईश्वरासारखे कार्य करू शकत नाही. पण तुम्ही ईश्वरी शक्तीचा वापर करता व तिला निरनिराळ्या पध्दतीने कार्यान्वित करता. उदा. ईश्वर विश्वातल्या सर्व घटनांचे नियंत्रण करतो अगदी लहानात लहान कणांचे सुध्दा ईश्वर नियंत्रण करतो. जेव्हा तुमचे सहस्त्रार उघडते , व कुंडलिनी तुमच्या टाळूला स्पर्श करते तेव्हा एक प्रकारची प्रतीत होणारी शक्ती तुमच्या सहस्त्रात तयार असते आणि टाळू मधील ब्रम्हरंध्र उघडल्या बरोबरच आत्म्याच्या कृपेमुळे ती शक्ती प्रज्वलीत होते. व तुमच्या नाड्या प्रकाशित होतात. सगळ्याच नाही पण बऱ्याच व संपूर्णपणे प्रकाशित होतात असेही नाही. पण पुष्कळ प्रमाणात त्यांच्या कडा प्रकाशित होतात. अशा तऱ्हेने तुम्ही प्रकाशित होता. तुमची सात चक्रे सहस्त्रारमध्ये असल्याने बऱ्याच गोष्टी घडतात. प्रकाशामुळे तुम्हाला त्यांची स्थाने सर्व साधारणपणे दिसतात. तुमच्या जाणीवेतून ती कार्यरत होतात. याचा अर्थ तुमच्या डोळ्यांना दिसत नाहीत पण तुमच्या मनाला त्या एकाग्रतेची जाणीव होते. तुमच्या हृदयापासून अलग झालेली बौध्दिकता हृदयाशी एकरूप होते. जेथे जेथे तुमचे चित्त जाते तेथे तुम्ही सामुहिकरित्या कार्य करता. तुमच्या चित्ताची सर्व कार्ये आशिर्वादीत होतात. तुमचे चित्तच परिणामकारक बनते. तुमचे चित्त फार महत्वापूर्ण बनते. तुमच्या इच्छा तर जास्त महत्वाच्या आहेत. कारण त्या अशा तऱ्हेने एकत्र झाल्या आहेत की तुमच्या इच्छा व तुमचे चित्त एक होऊन जातात. जे तुमच्या आत्म्याला हितकारक आहे त्याचीच तुम्ही इच्छा करता. आत्म्याची

शक्ती जेथून येते तेथेच तुमचे चित्त जाते.तुमचे अग्रक्रम बदलतात. जे अगदीच तळाशी आहेत , उत्क्रांत झाले नाहीत पण ज्यांची बौध्दिक वाढ झाली आहे त्यांना आपले चित्त वापरुन पहायचे असते. अशांना , प्रथम कुंडलिनी कशी चढवायची ते शिकायचे असते.ते तर्काने जाणून घ्यायचे असते.

संतुलनात असलेल्या व्यक्तीला कोणतेही प्रश्न विचारायचे नसतात.आपल्यात काही लोक असे आहेत , त्यांनी प्रश्न विचारले नाहीत. ते फक्त घटित झाले , व त्यात त्यांना स्थैर्य मिळाले. ते अबोधित (Innocent) आहेत , हुषार आहेत , व सर्वात महत्त्वाचे म्हणजे आत्म्याशी संलग्न (Spiritual) आहेत.तुमच्या स्वभावात कोणतेही दोष असोत , सहस्त्राराचे माध्यमातुन ते सुधारता येतात. सर्वात प्रथम तुमच्या अहंकाराचे तुम्हाला दमन करावयास हवे. कारण अहंकार असेल तर तो सहस्त्रारास दाबतो.सुपरइगो पण संपविला पाहिजे.कारण तो सुध्दा सहस्त्रारास दाबतो व दुःख देतो. म्हणून सहस्त्राराची निगा राखली पाहिजे. जागृत झाले पाहिजेत अग्रक्रम बदलले पाहिजेत. काही लोकांना मुद्दाम प्रयत्न करावे लागतात.कारण त्यांना जरा वेळ लागतो.पुष्कळ पुस्तके अशी आहेत की तुम्ही ती वाचाल तर तुम्हाला ईश्वर विरोधी कारवाया करायला ती प्रवृत्त करतील.प्रकाशित असलेल्या सहस्त्राराला ते सहन होत नाही व ते परत मिटते.ते विषासारखे वाटते.मनांत विषारी विचार आलेले त्याला सहन होत नाही , व ते बंद होते.विष जवळ ठेवूनच जर तुम्ही सहस्त्रारात जाल तर ते परत बंद होते.तसेच काही लोक फारच संतापी असतात व अहंकाराचे अनेक भार त्यांना असतात व त्यामुळे जर सहस्त्रार दबले तर परत ते बंद होते. ज्याच्यावर वाईट गुरुंच्या किंवा पुस्तकांचा , वाईट देशाचा , वाईट मार्गानं पैसा मिळविण्याचा परिणाम झाला असेल अशांचे सहस्त्राराची योग्य तऱ्हेने वाढ होत नाही.

सहस्त्राराची वाढ व्हावयास हवी.आत्म्याची नव्हे.जितके सहस्त्रार जास्त संवेदनशील तितके त्याला आत्म्याच्या(Qualities) (गुण) मिळतात. शांतीची अनुभूती सहस्त्रारात येते. आत्मिक अनुभूती सुध्दा सहस्त्रारात प्राप्त होते. तोच मेंदू आहे.व मेंदुच मज्जासंस्थेचा कार्य बिंदू आहे. मध्यवर्ती मज्जेसंस्थेचा म्हणजेच तुमच्या चेतनेचा होईल.तितक्या जास्त (Channels) चा नाड्या म्हणून वापर करून व त्यांच्या शक्तीचा वापर करून पध्दतशीरपणे त्यांना कार्यन्वित केले पाहिजे.परंतु जागृतीनंतर सुध्दा जे लोक वाईट सवयी मध्येच रममाण होऊन जातात , ते नाड्यांच्या प्रवाहात अडथळे आणतात व विचाराला ते फारच नुकसानकारक असतात.अशा लोकांनी सहजयोग सोडावे हे उत्तम. अथवा अशा लोकांना सहजयोग सोडण्यास सांगायला पाहिजे.जे लोक ईश्वराच्या या महान कार्याच्या विरोधात आहेत अशांशी सर्व संबंध तोडले पाहिजेत.

ज्यांना आपल्या सहस्त्राराची वाढ व्हावीशी वाटते अशांनी वाईटाची संगत ठेवू नये.व नेहमीच सहज योग्यांच्या संगतीतच रहावे. स्वतःशी अशी निराळी ड्युटी त्यांना नसावी. बहुतेक वेळ सहजयोग्यांच्या संगतीतच घालवावा. सहस्त्राराच्या नंतर जेव्हा तुम्ही सहस्त्राराच्यावर असता , तेव्हा तुमच्या लक्षात येईल की या त्यांच्या देवता व्यवस्थित व संलग्न ठेवल्या पाहिजेत.हे सर्व चित्ताने , स्वतःकडे , स्वतःच्या विचाराकडे लक्ष ठेवून सुध्दा साध्य करता येईल. तुम्हाला तुमचा अहंकार व प्रतिअहंकार दिसू लागतील व तुम्ही स्वतःला कसे फसविता व कसे स्वतःशी अप्रामाणिक आहात. हे कळेल.स्वतःची कशी समजूत घालता , अहंकाराची मजा कशी वाटते.

जे आत्मा बनले आहेत अशांसाठी सहजयोग आहे.म्हणून बाकीच्या सर्व उपाधी गळून पडल्या पाहिजेत सर्व प्रकारच्या चुकीच्या आत्मीयता गेल्या पाहिजेत. मी आधी सांगितल्याप्रमाणे सतर्क राहून हे साध्य होईल.प्रत्येकाने स्वतःला ठीक केले पाहिजे. कारण जागृतीनंतर जी काही इच्छा तुम्ही कराल ती ईश्वरी इच्छेचा भाग बनेल.जी कृती तुम्ही करावी ती ईश्वरी कृतीचा भाग बनेल. म्हणून आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की सतर्क राहून प्रयत्न करुन आपल्याबद्दल आपण माहिती करून घेउ शकतो. की आपण त्याबद्दल प्रामाणिक आहोत की नाही आपण जर प्रामाणिक असू तर हे लक्षात येऊ शकेल की , सामूहिकतां हा एकच सहस्त्रार मोठे करण्याचा उपाय आहे. त्यासाठी सहनशीलता हवी , सुज्ञता हवी. व एखादया प्रेषिताचे व्यक्तिमत्त्व हवे तुम्ही प्रेषित आहात आणि म्हणून तुम्हाला प्रेषितासारखे बोलावयास हवे , व स्वतःला तसे वागायला शिकविले पाहिजे. ते काही , खोटे पणाने वागणे किंवा केवळ अभिनय नाही , कारण तुम्ही जागृत आहात. जेव्हा जागृत नसता तेव्हा अशा वागण्यात कृत्रीमता येते. सहस्त्रार ही नियामक , मार्गदर्शक व उत्क्रांती घडवून आणणारी शक्ती आहे व म्हणून त्यास मोठे व विस्तृत होण्यास तयार ठेवण्यासाठी आपण स्वतःच्या

वाढीकडे लक्ष ठेवले पाहिजे.स्वत:च्या दुष्कृत्याचे समर्थन करू नका. जर तुम्ही समर्थन करू लागाल , तर तुम्ही त्याचा विचार करू लागता. आपल्याला त्याचा विचार करण्यास वेळ नाही.आपणास दुसऱ्याचा विचार केला पाहिजे. कारण , दुसरे सुध्दा तुमच्या मेंदूत आहेत , आणि जेव्हा तुम्ही दुसऱ्याचा विचार करू लागता त्याच्या पुनरुत्थानाबद्दल बोलू लागाल , तेव्हा तुमचे सहस्त्रार नक्की निश्चितच त्याचा आकार व सुक्ष्मता यांच्यात मोठे होईल. संवेदनशीलता वाढेल , गहनता येईल , हे एखादया वृक्षासारखे आहे. जेव्हा ते वाढते तेव्हा त्याची मुळे पण पसरतात म्हणून , तुम्हाला आता अंड्याच्या बाहेर पडून परत पसरवयास हवेत. तुमच्या मनाच्या सर्व कोत्यावृत्ती सोडून दिल्या पाहिजेत. हजारो लोकांना मार्गदर्शन , मदत व आधार देणाऱ्या आणि जागृती देणाऱ्या महान व्यतिमत्वासारखे तुम्ही राहिले पाहिजे.

फ्रॅन्स मधील हा सहस्त्रार दिवस जर या देशात एक नवीन निर्माण करेल , तर मला खात्री आहे की , लोकांच्या विचारांपर्यंत ते जरूर पोहोचेल.लोकांच्या मनात ते प्रतिध्वनीत होईल आणि त्याचा (Unconcious) त्याच्या शरिरामध्ये ते पसरेल आणि ते नव्यानेच विचार करायला सुरवात करतील. आता नविन (Break Through) घडून येतील , आणि लोक तकनिच सत्याकडे जाण्यास सुरवात करतील , ते योग्य निर्णयाप्रत पोहोचतील व जे निरूपयोगी व टाकावू आहे ते निघून जाईल.

सहस्त्रार हे आत्म्याचे सिंहासन आहे आणि जितका राजा मोठा तितके सिंहासन मोठे.तुम्ही तुमच्या आत्म्याकडे कसे लक्ष देता ते तुमच्या सहस्त्रारातून लक्षात येते.आणि अशा तऱ्हेने तुम्ही जागृती देऊ शकता.आणि मग तुम्ही सूक्ष्म शरीराचे बनता.तुमच्या चित्ताने तुम्ही दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करू शकता आणि त्याची कुंडलिनी चढवू शकता. सहस्त्रार प्रकाशित झाल्यावर तुम्हाला एक नविन प्रकाश प्राप्त होतो. की , त्याच्यामुळे तुम्ही सर्व काही , सुक्ष्म वातावरणातील सर्व सूक्ष्म घटना बघू शकता. जेव्हा तुम्ही उच्च आणि उच्चतर स्थितीपर्यंत वाढू लागता तेव्हा तुम्हाला तुमच्या भोवती व्हायब्रेशनचा प्रकाश दिसु लागतो.

तुम्हाला बऱ्याच गोष्टीमध्ये आवड (Interest) रहणार नाही.पण तुम्हाला आश्चर्य वाटेल की प्रत्येक गोष्टीवर तुमचे प्रभुत्व कसे आहे. जणू काही जे तुम्हाला हवे आहे तेच तुमचा मेंदू घडवून आणीत आहे.पूर्णतया विराट स्वरूपात असलेल्या श्री कृष्णानी हेच वचन दिले होते म्हणून तुम्ही तुमच्या मेंदुवर प्रभुत्व मिळवू शकता , कारण खरे म्हणजे आत्म्याचेच मेंदुवर प्रभुत्व असते.जितका जास्त आत्मा तुमच्या चित्तात येईल तितके सहस्त्रार आकाराने वाढेल , त्यांची प्रभा फाकेल व तुम्ही जास्त शक्तिशाली सहजयोगी व्हाल. सर्व शक्तिमान परमेश्वराला हे घडून आलेले बघण्यात धन्यता वाटेल.म्हणून सध्यातरी ते तुमचा राग आणि क्रोध करणार नाहीत व मानवाच्या चुकांची त्यांच्या हेकटपणाची व बालीश बडबडीची ते क्षमा करतील. मानवाला त्याच्या पित्याचे वैभव व महानता पहाण्यास मोठे होउ दे. ईश्वराची करूणा झेलण्याची शक्ती त्यांच्यामध्ये येऊ दे. त्याचे सहस्त्रार इतके विस्तृत होउ दे की , ईश्वराचे कार्य त्याच्या चित्तातूनच तो करेल.

सहस्त्राराचा एकच मंत्र आहे.तो म्हणजे " निर्मला " ह्याचा अर्थ प्रत्येकाने ते स्वच्छ पवित्र आणि निर्मळ ठेवले पाहिजे.ते तुमच काम आहे. फक्त ते स्वच्छ आणि पवित्र ठेवण्याचा प्रयत्न करा आणि आणखी एक पुढच पाऊल पडेल , व अनेक मानव एका नविन क्षेत्रात अतिशय वेगाने वर जातील.

आज पॅरिसमध्ये येण्यास फारच आनंद वाटत आहे त्याच्यामुळे सर्व जगाचे चित्त फ्रान्सवर असले पाहिजे.हा देश सर्व देवतांनी दुर्लक्षिलेला व शापित असा आत्तापर्यंत होता. कारण येथे माणसे फारच चुकीची वागली. सर्व देवतांचे वास्तव्य येथे असू दे कारण हे चित्त आहे आणि जे काही आपण चित्त देऊ ते सहस्त्रारामधूनच आपल्याला समजेल , म्हणून फ्रॅन्सचा सहस्त्रार उघडू दे. आणि फॉन्सचे चित्त आपल्याकडे व चिरंतनाकडे लागू दे.हा फार महत्वाचा देश आहे , म्हणून मी येथे सहस्त्रार दिवस साजरा करण्याचा ठरविले. फ्रेंच सहजयोग्यांवर फार मोठी जबाबदारी आहे.त्यांना त्यांच्या पध्दती बदलायला हव्यात. त्यांना प्रेमळ , दयाळू व सशक्त लोक झाले पाहिजे.पण त्याच बरोबर एक शक्तिशाली सहजयोगी झाले पाहिजे. म्हणजे लोक जेव्हा त्यांना बघतील तेव्हा त्यांच्यातुन उच्चता लोकांच्या दृष्टीस पडली पाहिजे. मला आनंद आहे की सहस्त्रार दिवसाच्या आधी एक यशस्वी सेशन येथे झाले.आता जगातील सर्व फ्रेंचांना ज्यांनी पूजा केल्या किंवा करीत आहेत त्यांना वृध्दिंगत झालेले प्रकाशित सहस्त्रार ठेवण्यासाठी अशिर्वाद देते.त्यांचे सहस्त्रार इतके विस्तृत होऊ दे की , ते विराटाशी एकात्म होतील.

ईश्वराचे त्यांना अनेक अशिर्वाद.

# होली तत्त्व

## दि. १७-३-१९९५

आज होली है। आज की होली पहले से बहुत भिन्न है ? होली का , तत्त्व जानना चाहिए। होली में हमारे अंदर की गंदगी और दोष जलाकर हृदय शुद्ध करते ही जो प्रेम उमड आता है उसके चैतन्य से सब तरफ चैतन्य के रंगों की बौछार होकर सब लोग मस्त हो जाते हैं। इसीलिए सर्वप्रथम होली में हमारे अंदर की बाधाएँ जलानी चाहिए।

सहजयोगमें राजनीति नहीं होनी चाहिए। पूरे समाज के लोगों में राजनीति की जो ज़बरदस्त पकड है इस कारण सहजयोगी भी इसके लपेट में आ जाते हैं। एक व्यक्ति जो पूरी तरह सहजयोग न जाना हो दूसरें को आपने इस दोषी स्वभाव से कुछ कह देता है और फिर दूसरोंमे इसका असर आ जाता है और वो भी किसी और तक पहुँचा देता है। जैसे कुछ हवा सी चलती है , फ्लू की तरह। यह एक बिमारी है। यह फैलती जाती है। पहले के ज़माने में औरतें राजनीति करती थी और आदमी लोग लड़ते थे , लेकिन अभी उलटा हो रहा है। कोई भी आदमी जो ऊँचा उठना चाहता है उसे ऐसी हरकतों में नहीं उलझना चाहिए।

यह एक बड़ा भारी प्रेम है। मै देखती हूँ , मैं बोलती नहीं लेकिन मैं सब जानती हूँ। सहजयोगीयों में आपस में बैर नहीं होना चाहिए। यह अटॅचमेंट के कारण होता है। नारद मुनि की तरह सहजयोगी एक दुसरे को उलट पुलट चीजें बताकर आपसी बैर बढ़ाते जाते हैं। इस आपसी बैर बढ़ने से प्यार का जाल टूट जाता है। हमें सहजयोग से प्यार होना चाहिए और माँ से प्यार होना चाहिए। फिर भी यह चीज़ पहले से अभी कम है।

लेकिन अब लोग दुसरी तरफ जा रहें हैं। कोई कहते हैं हम दिल्ली के सहजयोगी है , कोई नॉयडा के , फिर कोई और अपने को कहीं और का सहजयोगी कहता है। हम सब एक हैं। हम मे , कोई दिल्ली का , बम्बई का ऐसा फर्क नहीं होना चाहिए। हम सब एक हैं। हम सहजयोगी हैं। समुद्र की बात करो , बुंद की नहीं। कोई आपको कुछ बोल के परेशान करता है कोई बात नहीं , उन्हें कहने दीजिए। वह सब सामने आता है , धीरे धीरे।

हमारी शादी हुई थी। तब हमारे यहाँ सौ से भी ज़्यादा आदमी थे। हमनें कभी किसी चीज की परवाह नहीं की। कोई कुछ कहे कोई बात नहीं साधू संत जैसे रहे ,

सब की सेवा की। सबको खुश रखा। अब भी हमारे दोस्त है लेकिन हमारे पति के नहीं। जब भी हम लखनऊ जाते है तो सब के सब सिर्फ हमें मिलने आते हैं। हमसे उन लोगों को बहुत लगाव है। हमारे पति को मिलने कोई भी नहीं आता, सब हमें मिलने आते हैं। निर्वाज्य प्रेम होना चाहिए।

कोई कुछ कहे, बके हमें उससे कोई मतलब नहीं। अगला जनम तो हम सहजयोगियों को है नहीं, और अगर हो भी तो संत का जन्म रहेगा। इस जनम का इसी जनम में धोइए, स्वच्छ हो जाइए। अगले जनम में धोने का अवसर नहीं मिलेगा। जो भी कुछ धोना है अभी धोना है, इसी जनम में ताकि अगला जन्म हो भी तो वो दोषरहित हो। संत का जन्म रहेगा।

अग्रेशन हममें है। अग्रेसिव स्वभाव है, दूसरा, लोगों में बाधा भी है। इन दोनों को हम निकाल सकते हैं। सहजयोग में हमारे पास इसके लिए उपाय है। यहाँ सब निकाल देना चाहिए। तीसरा, हिपोक्रसी। अपने आप को बढ़वा देकर लोगोंकि सामने पेश होना। अंदर है कुछ और लोगों को बढा चढाकर बताना कुछ और। इससे हमें क्या फायदा। हम अपने आपको धोखा दे रहें हैं। अंदर से काट रहे हैं। अंदर और बाहर एक चीज़ होनी चाहिए। बग़ैर इन दोषों को होली में जलाए कोई फायदा नहीं। फिर वह कृष्ण की होली नहीं रहेगी। बदला, दोष, बाधा सब होली में जलाइए। ग्रुपबाजी, राजनीति सब जला दीजिए। एक ग्रुप, एक जाति नहीं होना चाहिए। यह हमारे लिए ठिक नहीं है। एक ग्रुप बनाकर रहना ठीक नहीं। एक जाति के लोग अपना ग्रुप बना लेते है, यह ठीक नहीं है। अब हम सहजयोगी बन गए हैं। हम किसी ग्रुप या किसी जाति के नहीं रहे। अपने ही लोगों को महत्त्व देना बेकार बात है। अपने ही जाति के लोगों को अपने ही इलाके के लोगों को आगे करना ठीक नहीं। जो अगुआ हैं उन्हें इस तरफ ध्यान देना चाहिए, रस और दृष्टी करनी चाहिए। उन्हें देखकर बाक़ी लोग भी वैसा ही बर्ताव करते हैं। यह सब होली में जलाएँ। इसके लिए एक मंत्र है; बहुत बडा मंत्र - "सबको माफ करो"। इसके बग़ैर उन्नति नहीं। हमें मां से मतलब है, सहजयोग से मतलब है। कोई अगर कुछ ग़लत कहे तो उसे सुबुद्धि से जानो, उनको बकवास करने दो। हमारा ख्याल इस तरफ होना चाहिए की इस ग़लत बात को सुनकर हमारे अंदर कोई ग़लत बात तो नहीं जा रही है?

हम बुद्ध को जानते हैं और सबको मारते हैं। यह छोड दो। वैमनस्य से कोई लाभ नहीं। अपने अंदर के षट्रिपुओं को जलाओ। हमें व्यक्तिगत तौर पर उन्नति हासिल करनी चाहिए। व्यक्तिगत तौर पर इसी से संपूर्ण सृष्टी में बदलाव आएगा। एक सेब यदि ख़राब हो तो पचास सेबों को खराब कर देता है। लेकिन सहजयोग में एक व्यक्ति बाक़ीयो को ठीक करता है - पचासों को। एक खराब स्वभाव का औरो पर असर पड़ताहै। परिवार में भी यह चीज़ हम देखते हैं। यदि परिवार में एक व्यक्ति भी खराब स्वभाव का हो तो सब पर असर आता है। लेकिन सहजयोग में ऐसा नहीं है। एक भी अच्छा सहजयोगी हो तो वह सबको ठीक करता है। यदि कोई

ग़लत व्यक्ति हो तो वह अपने आप निकल जाएगा। हमें उसमें अपना चित्त डालने की ज़रूरत नहीं है। वह चीज आप मुझपर छोड दीजिए।

होली में जलाने के लिए सब लोग अपने अपने घर की लकडी देते हैं ताकि उस लकडी के जलने से उनका घर बाधारहित हो जाए। सहजयोग में यह लकडी याने हमारा शरीर है। अपने शरीर की लकडी जलाकर स्वयं को सोना बनाओ। अपनी क्षमा की शक्ति को बढाओ। राईट साईड को कम करें। "हम्" और "क्षम्" आज्ञा के दो मंत्र हैं। जो भूत बाधाओं से पिडीत है वह बाधा निकालने के लिए औरों का सहारा लेते हैं। इससे कोई फायदा नहीं। इसे हम खुद निकालें। हमें अब औरों की सहायता की जरुरत नहीं। यह कहना चाहिए कि मैं सहजयोगी हूँ या मैं सहजयोगिनी हूँ, बाधा दुर हो जाएगी। दूसरों को मत ढूँढो। बाधित लोगों को मत ढूँढो। इससे बाधा बढ जाती है। वह शारीरिक हो या मानसिक हो उनका एक ग्रुप बन जाता है।

एक और बात मैंने देखी है कि लोग मुझपर अपना अधिकार जताते है। चर्चा शुरू कर देते है। मैं देखती हूँ। तुरंत स्वाधिष्ठान पुरी तरह जकड जाता है। और चर्चा का कोई अंत ही नज़र नहीं आता। तीन-तीन बजे तक बैठे रहते हैं। अरे भाई, हमनें आपको समझाया आप बाधा ग्रसित हो, आपका घर शमशान के पास है उसे छोड दो। किराये का घर है उसे छोडने में क्या हर्ज है लेकिन नहीं। उस तरफ आपका ध्यान नही, और अधिकार जताते जा रहे हैं। हमने देखा है बाधा वाले सबसे आगे रहते हैं। बाधा चिपकती है।

प्रोटोकॉल होना चाहिए। माँ के प्रति श्रद्धा होनी चाहिए। सहजयोग में नितांत श्रद्धा होनी चाहिए। श्रद्धा के विना चर्चा करने से दाहीनी विशुद्धि तुरंत पकडी जाती है। प्रोटोकॉल का ख्याल करना चाहिए। जब भी ग़लत बात होती है तो प्रोटोकॉल की तरफ ध्यान देना चाहिए। सबसे ज्यादा श्रीकृष्णने राक्षसों को मारा। श्री राम ने राक्षसों को मारा। लेकिन लोग मुझे कहते है माँ जैसा अवतरण आज तक नही हुआ है। आपका कार्य महान है। आप में लोगों के अंदर स्थित राक्षसी प्रवृत्तियों को नष्ट करने की शक्ति है।

प्रतीकात्मकता से होली जलाओ। स्वच्छ हो जाओ। मुक्ति में जो आनंद आ रहा है इसमें नाचो गाओ और सबको आनंदित करो। सहजयोग की होली कृष्ण की होली है। आपकल तो लोग होली में भंग पीते है, श्री कृष्ण क्या भंग पीते थे? भंग तो सिर्फ शिव शंकर पीते है। जिनको भी सहजयोग में रहना है उन्हे व्यामिचार त्यागना होगा। यही होली का महत्त्व है।

खाने-पीने को हम बहुत महत्व देते हैं। किसी को चाट कहा अच्छी मिलती है, मिठाई कहाँ अच्छी मिलती है, यहाँ ये - यहाँ ये, सारा चित्त इन्ही चीजो में लगा रहता है। आस्वाद होना चाहिए। ये या वो। कहते हैं श्री कृष्ण को लड्डू ज्यादा पसंद हैं और देवी को पूरणपोली। अब आप लोग भी मेरे लिए कुछ कुछ बनाकर लाते हो लेकिन मुझे इन चीजो से कोई मतलब नहीं। आस्वाद होना चाहिए। आस्वाद में उतरना चाहिए। अब आप लोग इतने

प्यार से मेरे लिए चीज़े बनाकर लाते हो इसीलिए मै तो खा लेती हूँ। वो बात अलग है। हाँ दुसरों को बनावाकर खिलाओ। ज्यादातर उत्तरी भारत में लोगों का खाने में ध्यान ज्यादा है फिर महाराष्ट्र में भी है और दक्षिण भारत में भी है। वैसे सभी जगह है। हमें लोग पुछते हैं आपको क्या पसंद है। हमें तो याद भी नहीं आता कि हमें क्या अच्छा लगता है।

ईसा मसीह ने कहा था - "Hate sin and love the sinner. पाप का द्वेष करो और पापीको प्यार। सहजयोग प्यार से ही बढनेवाला है आप अपने प्यार को बढाइए। इस मामले में विदेशी हिन्दुस्तानियों से कई अच्छे है। वो कभी आपसमे झगडते नहीं। जो उन्हे मिले उसी मे खुश रहते है। लेकिन हम हिन्दुस्तानियों का ऐसा नहीं है। यहाँ पर तो चार लोग एक बाथरुम इस्तेमाल करते हैं लेकिन जब गणपतीपूले जाते है तब (Attached Bath) चाहिए। विदेशियों का ऐसा नहीं है। वो लोग अपने देश में खुद की मोटर रखते है, हवाईजहाज़ से सफर करते है। हमारे जैसा खाना वो लोग खाते नहीं। उनका खाना अलग होता है। लेकिन जब वो यहाँ आते है हमारा खाना तक तो बडे प्यार से खाते हैं और इतना ही नहीं उसकी प्रशंसा भी करते हैं। वैसे वो लोग तो हमे भगवान ही समझते हैं क्योंकि वे जानते हैं की शरीर का आराम, आराम नही है, ध्यान आत्मा की तरफ रहना चाहिए। उन लोगों की अपनोंसे से बहुत अपेक्षाएं हैं। हमें उन अपेक्षाओं की परफ ध्यान देना चाहिए।

और भी कई चीजे है जैसे कोई भी काम बग़ैर पुछे करने लगते है। मुझे पुछे बग़ैर काफी चीजे की जाती हैं। इससे अंत में नुक्सान हो जाता है। पुछना चाहिए। इसी में सबकी भलाई है। ऐसा क्यो होता है, इसकी तरफ ध्यान देना चाहिए। असल में होली का तत्त्व यही है की अपने आपको अंदर से साफ करना चाहिए।

येशु क्रिस्त बहुत पहले कश्मीर आए थे तब उनकि मुलाकात हमारे पुर्वज राजा शालीवाहन से हुई थी। तब उनके पुछने पर येशु क्रिस्त ने बताया "मुझे ईसा मसीह कहते हैं और देश से मैं आया हूँ वहाँ के लोगों को म्लिच्छ कहते हैं (जो मल की इच्छा रखते हैं) इसीलिए मैं आपके देश में आया हूँ। तब राजा शालीवाहन ने उनसे कहा कि वे अपने ही देश मे वापस जाकर उन लोगों से कहें की वे "निर्मलम् तत्त्वम्" अपनाए। सहजयोग का जो काम है यदि मेरे अकेले से हो सकता तो आप लोगों की जरूरत ही नही रहती। लेकिन यह कार्य आपके माध्यम से होना है। आप सभी लोग सहजयोग के माध्यम हैं। आप सब जितने स्वच्छ रहेंगे उतना आप सहजयोग के लिए उपयुक्त साबित होंगे। यह आपकी गहराई पर निर्भर करता है। और गहराई आएगी कैसे? गहराई श्रद्धा से प्राप्त होगी। समर्पण से। अगर हमे मोती हासिल करना है तो समुद्र की गहराई में उतरना होगा। इसीलिए गहराई में उतरना चाहिए। अब देखिए जो विदेशी यहाँ आ रहे थे उन्हें आधे पैसे में टिकिट प्राप्त हुआ और उन्होंने श्रद्धा से बैंकाक जाने की इच्छा करते ही उन्हे उसी टिकिट पर बैंकाक जाने की स्वीकृति मिली। गहराई में उतरने से सब चीज़ अनायास प्राप्त हो जाती है। इसीलिए गहराई में उतरना चाहिये तब तक कोई फायदा नही।

# तत्व भाग अेक

## प. पू. श्री. माताजींनी दिल्ली विद्यापिठ (गांधी भवन) येथे फेब्रुवारी १९८१ मध्ये केलेल्या हिन्दी भाषणाचा अनूवाद

दिल्ली विद्यापीठाच्या ह्या सुंदर प्रांगणात अनेक वेळा येणे झाले कोणता न कोणता तरी नवीन विषय येथे सांगितला जातो. अनेक वेळा लोकांना येथे जागृति दिली आणि जागृति नंतर काय करायला पाहिजे हे ही बऱ्याच वेळा मी समजावून सांगितल.कारण , अंकुराचा प्रादुर्भाव होणं. अंकुर जागृत होणं हे तर प्रत्येकासाठी गृहितच असत , लिहिलेलच असतं आणि जर त्यातून अंकुर निघाला तर तो त्याचा स्वभाविक धर्मच झाला आहे , ते अगदी सहज स्वेच्छेने घडून येते. जर तुमच्या मध्ये अंकुर असेल तर त्यांचे अंकूरित होण्यात विशेष अशी काही गोष्ट नाही , नेहमी आपण बघतो की ह्या पृथ्वी मातेच्या पोटांत कोट्यावधि बिजे वाढतात. कोणतेहि बी तुम्ही पेरा त्यातून अंकूर हा फुटणारच.ती आपल्या प्रेमाने तो अंकुर कसा जागृत करते कश्या तऱ्हेने जागृत करते हे आपल्याला समजत नाही. कारण ती अेक तिच्या दृष्टिने नैसर्गिक गोष्ट आहे. तिच्या धर्मा प्रमाणे तिच्या स्वभावा प्रमाणे हे अंकुरित करण अगदी साधा खेळ आहे.त्यात विशेष काही नाही.परंतु जस येशू ख्रिस्तांनी सांगितले कि पुष्कळ बिजे होती काही बीजे दगडावर पडली , काही बीजे खडकावर पडली. त्यांच्या पैकी काही अुर्वरा भुमिवर पडली पण त्यांच्या पैकी काही अगदी चांगल्या जमिनीवर पडली आणि तीथे ती वाढू लागली हे त्यानी दोन हजार वर्षापूर्वी सांगितलं ह्याचा अर्थ असा की , जगात पुष्कळ साधक आहेत ते परमेश्वराचा शोध घेत आहेत आणि परमेश्वरासाठी काही ना काही करीत राहतात. ते मंदिरात जातील किंवा चर्च मध्ये जातील किंवा आणखी कुठे जातील. त्यांच्या मध्ये निरनिराळ्या श्रेणी आहेत.त्यांच्या पैकी काही दगडांवर आणि खडकावर डोके आपटून घेत आहेत , त्यांना माहिती आहे की , ह्याचा काही अुपयोग नाही तरी सुध्दा ते आपल डोकं आपटतच आहेत.तुम्ही कितीहि डोकी घासा शेवटी खडक तो खडकच तो कधी तुमचा अंकूर अुगवणार नाही.

आता , मनुष्य धर्माच्या बाबतीत कोणीतरी बाह्यात्कारी गोष्टी करित असतो आणि त्यामुळे धर्मान्ध बनत जातो.त्याला असं वाटतं कि त्याने परत्म्यासाठी बराच त्याग आणि बलिदान केलं आहे. अशा लोकांना तुम्ही जरी सांगितले की ह्याचा काही फायदा नाही तुम्ही अुर्वरा जमिनीवर आलात तरी जरी फायदा नाही तुम्ही अशा जमिनीवर या कि जिथे तुमचे पूर्ण संगोपन होअील , तुमची पूर्ण वाढ होअील , तिथे सर्व तऱ्हेची शितलता असेल तर , अशा ठिकाणी ज्याला तुम्ही अंकुरित होणं म्हणता ते घडून येअील. पण ह्यावर विश्वास ठेवायलाहि फार थोडी लोकं तयार आहेत. मोठ आश्चर्य आहे , माणसाच तर मला काही समजतच नाही त्याच्या सारखा हट्टी प्राणी जगात नाही. कोणताहि प्राणी अितका जिद्दी आणि हट्टी नाही.सर्व बाजूनी जरी आपण अज्ञानात असलो , आपल्या बौध्दिक जमाखर्चाने सर्व बाजूनी आवरणांनी आपण स्वतःला गुंडाळून घेतले

तरी सुध्दा आपल्याला अस वाटतं की आपल्या पेक्षा जास्त हुशार कोणी नाही. तर अश्या लोकांवर काय इलाज करावा, मला तर काही समजत नाही. जसं तुम्ही धर्मांन्ध लोकाना बघता, आताच मी अेका मंदिरात गेले होते पहिल्या प्रथम गेले तेव्हां खूप गर्दी होती. दुसऱ्यांदा गेले तेव्हां फार थोडे लोक आले. जेव्हां मी विचारलं कि काय झाल लोक कां नाही आले तर मला सांगण्यात आलं, माताजी लोक तुमच्यावर नाराज आहेत. मी विचारल कां? तर म्हणाले कि तुम्ही सांगितल होतं ना कि देवाच्या नांवावर अुपवास करायचे नाहीत.

कोणी सांगितल की अुपवास करून देव मिळतो. जितके लोक अुपवास करतात त्यांना काय देव मिळणार आहे? त्याच्याशी देवाचे नांव जोडून काय फायदा होणार? कां तुम्ही अुपवास करता? तुम्ही सहजयोगात याल तेव्हां तुम्हांला कळेल की ज्या दिवसाचा तुम्ही अुपवास करता त्या दिवसाची देवता तुमच्यावर नाराज होते. जस तुम्ही गुरूवार करता अुदाहरणार्थ अेका माणसाच पोट खराब आहे तुम्ही जर त्यांना विचारलं कि तुम्ही गुरूवार करता कां किंवा तुम्ही दत्ताला मानता कां तुम्हाला कळेल की अशा माणसाचे पोट नक्की खराब असेल किंवा दुसऱ्या गुरुला मानत असतील तर त्यांचे पोट खराब असेल. मी जर सागितल कि गुरूवारी, सोमवारी किंवा कोणत्याहि वारी अुपवास करू नका कारण हे सर्व दिवस अेकेका देवा साठी ठेवलेले आहेत. त्या दिवशी ते ते देव विशेष रुपाने जागृत असतात आणि त्यांना नाराज करायचे असेल तर आपण अुपवास करतो जर अेखादा माणूस तुमच्यावर नाराज असेल तर तुमच्या वरी तो भरल्या ताटावरून अुठून जाअील किंवा म्हणेल की मी तुमच्या घरी जेवणार नाही कारण मी तुमच्यावर रागावले आहे याचा अर्थ जेव्हां आपल्याला नाराजी दाखवायची असते किंवा कशी तरी दाखवायची असते तेव्हां आपल जेवण बंद करतो.

तर मग तुम्ही कोणत्या कारणा करिता अुपवास करतां? मला तर अजून पर्यन्त समजलेले नाही की माणसाला हे कोणी शिकविले? ज्या दिवशी तुम्ही अुपवास करता त्या दिवशी ज्या देवाचा तो दिवस आहे, ज्या चक्राचा जो दिवस आहे, त्या दिवशी त्या देवाचा अुत्सव केला पाहिजे, ज्या दिवशी श्री गणेशाचा जन्म आहे त्या दिवशी तुम्ही अुपवास करणार? आणि ही अेक साधी गोष्ट लोक अैकायला तयार नाहीत. ज्या दिवशी श्री गणेश जन्माला आले त्या दिवशी अुपवास करूं नका, ज्या दिवशी श्री राम जन्माला आले त्या दिवशी अुपवास करू नका. श्री कृष्णाच्या जन्मा दिवशी सुध्दा अुपवास करू नका. मेहरबानी करुन त्या दिवशी आनंद अुत्सव साजरा करा. आता ह्याच्या पेक्षा समजण्यासारखी गोष्ट आणखी काय असणार. परंतु आपल्या देश मध्ये हा वेडगळपणा हा आंधळेपणा अितक्या थराला गेला आहे, हा ब्राम्हणाचार आणि स्त्रीआचार ह्यांनी आपण अितके झाकाळून गेले आहोत कि, छोट्या छोट्या गोष्टींनी आपण नाराज होअुन जातो. पाश्चिमात्य देशांच्या बाबतीत सांगायच झालं तर असं की, तिथे लोकांना काही समजवाव तर समजणारच नाही कारण त्यांचा वादविवादच सारखा चालू असतो. ते तुमच्याशी सुध्दा वाद करतील त्याच कारण आहे की, ते भयंकर अहंकारी आहेत. त्यांचा अहंकार अितका भयंकर आहे की, अेखाद्या माणसानी जर त्यांच्यावर मायाजाल टाकले आणि ते मेस्मराअिज किंवा मंत्रमुग्ध झाले किंवा कोणती तरी मुर्खपणाची गोष्ट त्यांना सुचवली जस कि हात असे (वर) केले तर तुम्ही हवेत अुडायला लागाल, तुम्हाला हवेत अुडायला शिकवू तर ते तिन तिन हजार पौंड द्यायला तयार होतील अशी काही मुर्खपणाची गोष्ट त्यांना शिकवली तर ते फार खूष होतील. ह्याचा अर्थ कोणत्या ना कोणत्या तरी मुर्खपणाच्या गोष्टी कडे वाटचाल करण्याची त्यांची प्रवृत्ति आहे. पण कोणी त्यांना समजवू लागेल की जरा अक्कल धरा तर लगेच ते नाराज होतील.

मी येथे कोणाला खूष करण्यासाठी आले नाही कारण येथे खूष करण्याचा किंवा नाराज करण्याचा प्रश्नच अुद्‌भवत नाही. मी नाराज करायला किंवा खूष करायला आलेली नाही. मी एकद्यासाठी

आले आहे कि, तुमच्या मध्ये जी तुमची शक्ति आहे, तुमचा जो आत्मा आहे तो मला दिसतो आणि, तुमचे आणि त्याचे मिलन करुन द्यायचे आहे.त्याच्या मध्ये तुम्ही ज्या अडचणी निर्माण करुन ठेवल्या आहेत आपल्या हुषारी मुळे किंवा समजूतीमुळे, मी काही तुम्हाला मुर्ख नाही म्हणत परंतु जर काही चुका झाल्या असतील तर त्या तुम्ही ठीक केल्या पाहिजेत. तुमचा जन्म हिन्दुस्थानात झाला हिन्दुस्थानच्या सुध्दा काही पूर्वापार चालत आलेल्या चूकीच्या परंपरा आहेत. चांगल्या पण पुष्कळ आहेत चुकीच्या पण पुष्कळ आहेत आणि त्यांच्या मध्ये ज्या चुकीच्या आहेत त्यांना आपण जास्त पकडून ठेवलं आहे. चांगल्यांना नाहीं आता कोणी विचारले कि हिन्दुस्थान अैवजी लंडनमध्ये जर आम्ही जन्माला आलो असतो तर आमच्या परंपरा दुसऱ्या असत्या.पहिली गोष्ट अशी की तुम्ही माणूस आहात.माणसांनी जर हे लक्षात घेतल की मी अेक बिज स्वरूप आहे आणि बिज असल्यामुळे अंकूरित होणं हे माझ परम कर्तव्य आहे. मला दुसरं कोणतहि कर्तव्य नाही अंकुरित होण्या शिवाय मला कशाचहि महत्व नाही.

आता आपल्या देशामध्ये आणखी अेक वाअिट गोष्टीचा प्रादूर्भाव झाला आहे कि सकाळ पासून संध्याकाळ पर्यन्त धर्म विकला जातो. तुम्ही गंगेवर गेलात तर तुमची जेवढी श्रध्दा असेल तेवढे पाण्यात अुतरा मंदिरात गेलात तर तुमच्या श्रध्दे प्रमाणे पैसे ठेवा. अिथे देवाच्या नांववरती प्रत्येक गोष्ट विकली जाते.मी तर अैकल आहे की देवाचे गंध सुध्दा विकले जाते, ज्याला चवरी ढाळायची असेल त्याने पांच लाख रुपये द्यावेत व चवरी ढाळावी अशा तऱ्हेच्या वेडगळ पणाच्या कित्ती तरी गोष्टी आपण देवाच्या नांवावर करत आलो आहोत. त्यांच्यात तुम्ही लक्ष घातलं पाहिजे कीं आपण कुठल्या गोष्टीच्या मागे लागलो आहोत. हे सगळ आपल्या अहंकाराला पुष्टी देण्यासाठी मनुष्य करतो कि मी अितके रुपये दिले आणि मला चवरी ढाळण्यासाठी अुभे केले आहे व मी आता चवरी ढाळतोय. स्वतःला मोठे हुषार समजत असतात. ह्याला मुर्खपणा नाहीतर काय म्हणाव ? आता हे पाच लाख खर्च करण्यामुळे देव काय तुमच्यावर प्रसन्न होणार आहे.तुमच्या पैश्याची परमेश्वराला बिलकुल जरूर नाही. तो काही गरिब माणुस नाही. सारी सृष्टि त्यांचीच आहे. त्यांना रुपयांशी काय करायच असतं. त्यांना तर माहित सुध्दा नसत की, रुपये काय भानगड आहे. पैसा ही चीज समजून घेण्यासाठी त्यांना जन्म घ्यावा लागतो. मनुष्याचे वेडेपण समजुन घेणे ही काही साधी गोष्ट आहे कां? भयंकर अवघड. माणूस अितका वेडा आहे कि त्याच हे वागणे शिकायला परमेश्वराला फार मेहनत करावी लागते. ते काही साध सरळ काम नाही. जसं अेखादा माणुस धर्मा प्रमाणे वागत असेल तर त्याच्या हे लक्षातच येत नाही की लेक ह्या पाप पुण्याच्या गोष्टी का करतात हे करु नका ते करु नका, असं नको तसं नको अरे पण हे कोण करतं?

जस माझी अेक नात जी जन्मतःच पार आहे.अेक दिवस मला म्हणाली, "आजी, आमच्या शाळेत अेक मुर्खा सारखा विषय आहे" मी म्हणाले, कोणता? तर म्हणाली मॉरल सायन्स, अगदीच स्टुपिड सब्जेक्ट आहे.मी विचारले कां? तर म्हणाली, त्यात काय शिकवतात ते माहित आहे, खोटे बोलू नका, चोरी करु नका आता आम्ही काय नोकर आहोत म्हणून आम्हाला हे शिकवतात. घाण घाण गोष्ट शिकवित असतात. आता खोटे बोलू नका हे काही शिकवायला पाहिजे का. अेक दिवस म्हणाली की, मला दहा वाक्ये लिहायला सांगितली आहेत. सर्वांनी सारखे विभागून घेण्याबद्दल. मी म्हटले "त्यांना असं सांगायचे असेल की जेवण आपापसात वाटून घेत जा" तेव्हां ती म्हणाली, जेवण तर आम्ही वाटून घेतोच किंवा सगळे अेकत्रच जेवतो ही जी पार झालेली मुले असतात त्यांना हे समजतच नाही की चुकीच्या रस्त्यावर जायचेच कशाला, वाअीट कृत्य करायचेच कशाला? जर आम्ही चुकीच्या मार्गाने जात नाही तर आम्हाला हे सांगतातच कशाला?

अेक गोष्ट आहे. अेक पादरी अेका गांवात गेला. खेडेगावातले लोक विचारे अगदी साधे भोळे होते. त्या पादऱ्याने त्यांना बरेच काही सांगितले शेवटी जेव्हां तो जायला निघाला तेव्हां त्याच्या निरोप समारंभात त्या खेडूत लोकांनी सांगितले "पादरी साहेब तुम्हाला अनेक धन्यवाद कारण तुम्ही आम्हाला हे शिकविलेत की पाप काय असते आम्हाला हे माहितच नव्हते, की पाप म्हणजे काय." तेव्हां जे साधे भोळे निष्पाप लोक असतात ज्यांना ते माहित नसते की, हे सर्व काय आहे, त्यांना हे माणसाचे बाबतीत शिकणे फार अवघड होअुन बसते.

माणूस अितके वेडेपणा करतो की त्याला कसे समजावे हे कळतच नाही आणि समजावलेच तर राग येतो. काही निवडणूका आहेत, की, तुम्हाला कोणी त्रास देते आहे, की काही जिंकण्या हारण्याचा प्रकार आहे? असे कोणीच म्हणणार नाही की, बाबा खा विष, नाही म्हटले तर तुला राग येअील. माणसामध्ये ही समजून घेण्याची अिच्छा पाहिजे, की आपण या जगात का आलो? हा पहिला प्रश्न मंदिरात जाअुन पैसे अर्पण करायला आलो. का धर्माच्या नावावर दंगे धोपे व लढाया करायला आलो का. अिश्वराला शिव्या द्यायला आलो व अिश्वर अस्तित्वातच नाही असे म्हणायला आलो? पहिला प्रश्न तुम्ही स्वतःला विचारला पाहिजे की, जगात कशा करिता आलो? आपल्याला आम्ही अमिबा पासून ते या मानवाच्या अवस्थेपर्यन्त आणले याचा हेतू काय याचे अुत्तर कोणीहि शास्त्रज्ञ देअु शकत नाही कारण ते त्याच्या कुवतीबाहेरचे आहे कोणताहि शास्त्रज्ञ हे सांगू शकणार नाही की तुम्हाला मानव का बनविले. अेक लहानशा अमीबा पासून तुम्हाला फार मेहनत करुन बनविले आहे हा माणूस अेक विशेष गोष्ट आहे, पण मजेदार आहे. कधी कधी असे वाटते याला शिंगे नाहीत की शेपूट नाही, तसा बरा दिसतो पण अितका हट्टी का आहे? हे मला अजून समजले नाही, येवढा हट्ट, बैल किंवा घोडा फार तर थोडा वेळ करतात, पण हे लोक तर सारखेच हट्टी झाले आहेत आणि त्यांच्याशी लढता लढता मला हे च कळत नाही की यांना पार करून तरी काय होणार आहे? पंतजीना विचारा किती लोकांना मी पार केले आहे. त्यांना चैतन्य लहरी येअु लागल्या पार झाले, कुंडलिनी बद्दल त्यांना सांगितले, कुंडलिनी कशी जागृत होते. त्यांनी हे सुध्दा पाहिले की आमच्या समोर लोक येतात तेव्हां कुंडलिनी जागृत होते व स्पंदित होते.

त्रिकोणाकार अस्थिमध्ये कुंडलिनी राहाते व तिचे अुत्थान होते व ती ब्रम्हरंध्र छेदते व हे त्यांनी बघितले आणि हे घटित झाले व त्याच्या नंतर त्यांना व्हायब्रेशन्स पण आल्या हे सर्व झाल्यावर सुध्दा त्यांना प्रत्येक प्रकारचा अनुभव येअुन सुध्दा माझा फोटो ते घरी घेअुन गेले. आरती वगैरे करत अेक वर्ष घालविले व परत येअुन म्हणाले आमची व्हायब्रेशन्स गेली. जाणार नाहीतर मग काय होणार? पण ती जावीत ह्या साठीच तुम्ही सर्व तयारी करून ठेवली होती. तुमच्यामध्ये जर अेखाद बिज अंकुरित झाल तर तुम्ही त्याची कशी निगा राखणार? जर त्यावेळी त्याला अुचलून फेकून द्याल तर ते नष्ट होणारच. साधी सरळ गोष्ट आहे किती अमुल्य गोष्टी आअीने दिल्या आहे हे लोक लक्षात घेतच नाहीत. माझ्यासाठी कदाचित मौल्यवान नसेल कारण मला त्यात काही विशेष वाटत नाही, परंतु तुमच्या साठी मात्र ती जरूर मौल्यवान आहे कारण, तुम्हाला जर ती नाही मिळाली तर तुम्ही काय कराल? तुमच काय होणार? ह्याच्या शिवाय तुमच कसं चालणार? हेच तर मिळवायचं आहे समजा, तुम्ही हा माअिक्रोफोन बनविला आणि तो तसाच ठेवून दिला त्याला मेनस्वीचशी जोडलेच नाही तर त्याचा काय अुपयोग? त्याचे काय लोणचे घालायचेय? बहुतेक लोक अशाच प्रकारचे आहेत कि ज्यांना लोणचे घालायला पाहिजे अगदी निरुपयोगी लोक आहेत ते परमात्माच्या दृष्टिने अगदीच बेकार. स्वःला ते मोठे महान समजत असतील, त्यांना सगळ्यांनी नमस्कार करा हे करा ते करा अस त्यांना वाटत असेल, पण खरं म्हणजे

ते अगदीच बेकार आहेत. खरोखरच ज्याच्यासाठी तुम्ही ह्या जगात आलात ते म्हणजे परमात्म्याचे अिंस्ट्रुमेंट तर तुम्ही बनून बघा. त्यांना जाणा.गहनता ग्रहण करा आणि त्यांना साम्राज्यात या परमात्म्याने आपले साम्राज्य बनविले आहे ह्याचे कारण तुम्ही तेथे जावे तेथे तुमच्या सर्व स्वागताची तयारी आहे.सर्व व्यवस्था केलेली आहे की, कुण्डलिनीच्या आधाराने तुम्ही आंत प्रवेश करावा. परंतु तुम्ही असे आहात की, जाणार नाही असा हट्ट धरुन दरवाजातच अुभे राहिलात. आम्हाला जर ह्या चौकटीचच प्रेम आहे तर आम्ही काय करणार ? अशा तऱ्हेने मनुष्या मध्ये अितके भयंकर अज्ञान आहे कि मला असं वाटू लागतं कि ह्यांना जे दिल आहे त्याचा प्रकाश ते बघु शकणार नाहीत आणि त्यांना काही कळायचेहि नाही आता येथे न जाणो किती वर्षा पासून मी येत आहे. किती तरी लोक पार होत आहेत पण अिथे सहजयोगाची प्रगति फार धीमी आहे. विशेषतः विश्वविद्यालयात कारण हे विश्वाच विद्यालय आहे. मला तर ह्याचेच हसूं येत की, जिथे मला अपेक्षा नसते, तिथे अितके मोठे काम होअील असे मला वाटत सुध्दा नाही तेथे फार सहजच ते होअुन जाते.पण जे जरूरी पेक्षा जास्त हुशार असतात. जस कबीरान सांगितल आहे "पढी पढी पंडित मुरख भये" तसे जे अति हुषार आहेत त्यांचे पाय रस्त्यावर फक्त फिरत असतात व पुढे काहीच निर्माण होत नाही अस काही होअुन जातं म्हणून प्रथम ह्याचा विचार केला पाहिजे की आम्ही काय आहोत. तुम्ही आला आहात तुम्ही फक्त आत्मा आहात, बाकी काही नाही. बाकी सर्व बेकार आणि ह्या आत्म्याचा जो प्रकाश आहे, जे ब्रम्हतत्व आहे ज्याला आपण चैतन्य लहरी म्हणून ओळखतो, जे शितल असतात. हेच तुमचे कार्य आहे आणखी काही नाही. बाकी सर्व मिथ्या आहे. शरीर मिथ्या आहे हे तुम्ही जाणताच, तुम्ही रोजच बघता की शरीर मिथ्या आहे मी येत असताना पाहिले की किती तरी मोठे लोक येथे होते पण ते आता नाहीत. शिवाय तुम्ही हे पण जाणता आहात की, अहंकार मिथ्या आहे. मोठे मोठे लोक त्यांच्या स्थानांना चिकटून असतात आणि जेव्हा त्यांची खुर्ची हलते तेव्हां त्यांना पाताळ दिसु लागते. मन जे आहे ते सुध्दा मिथ्या आहे. अेखाद्या गोष्टीसाठी तुम्ही मनःपूर्वक काम करता, मनःपूर्वक हे करता, मनःपूर्वक ते करता पण तुम्हाला जेव्हां काही होते तेव्हा कोणीहि विचारत नाही. बुध्दी सुध्दा मिथ्या आहे कारण जे बुध्दीने समजाअुन घेता.थोड्या वेळातच त्याच्या अुलट बोलू लागता. बुध्दीची मजल कोठपर्यन्त ? जे समोर दिसते आहे तेथ पर्यन्त जसे बुध्दीने तुम्ही शास्त्र शोधून काढले आणि शास्त्राने हे सांगितले आहे कि पृथ्वीत आता गुरूत्व शक्ती आहे पण हे तर अुघड आहे यात सांगण्यासारखे ते काय आहे ? जुन्या ग्रंथामधे सर्व काहि आहे जे काही तुम्ही शोधून काढता आहात ते सर्व त्यात दिले आहे. पण ती कोठून आली ? का आली ? ती कशी आली आणि पृथ्वीच्या आत समावलेली ही जी गुरूत्व शक्ती आहे ती काय आहे ? या प्रश्नाची अुत्तरे तुम्ही दिली नाहीत. तुम्ही अेवढेच सांगितले की आम्हाला दोन हात आहेत, बरं आहेत आणि मग सांगितले की, ह्या हातांना पांच, पांच बोटं आहेत ठिक आहे आम्ही ते बघितलं आणि मग शिवाय शास्त्राच्या मदतीने तुम्ही अेवढेच सांगू शकाल की ही वस्तु कशाची बनली आहे.हे शोधून शोधूनच ह्या सर्वांची माहिती कळते आणि सांगता येते ह्याच्यात काय आहे आणि त्याच्यात काय आहे वगैरे वगैरे परंतु का ? आणि कसे ? ह्यांची अुत्तरे मिळत नाहीत. जसे आपल्या मध्ये श्री गणेश आहेत आणि श्री गणेशाची शक्ति आपल्या आत आहे हे जे तुम्हाला पाहिलं चक्र दिसत आहे त्या मुळाधार चक्रावर श्री गणेश आहेत. आता आम्ही तुम्हांला सांगतो की, आपल्या मुळाधार चक्रावर श्री गणेश विराजमान आहेत ह्याचा पुरावा शास्त्राच्या आधारावर तुम्ही देअु शकाल का ? आमच्या मध्ये स्थित असलेली श्री गणेशाची शक्ति कोठे आहे ? हे कोणी सांगू शकेल का ? कोणीहि ह्याचा पुरावा घ्यावा. कोणासहि तो देता येत नाही. ह्याच कारण हे आहे की ह्याचे अुत्तर आपण आपल्या बुध्दीने देअु शकत नाही. बुध्दि ही कायमच सीमित

आहे मी असीमच्या बाबतीत बोलत नाही.

जो पर्यन्त तुम्ही अमर्याद स्थितीत जात नाही , जो पर्यन्त तुम्ही असीम मध्ये अुतरत नाही तो पर्यन्त तुम्ही या प्रश्नाचे अुत्तर देअु शकत नाही की माताजी खर सांगताहेत का खोटं. आता मी तुम्हाला अेक प्रश्न विचारते हे सांगा की सेबेरियाहून पक्षी येतात , आपल्याकडे मध्य प्रदेशात जगदळपूर येथे सरळ सेबेरीयाहून पक्षी आलेले तुम्हाला दिसतील. आणि दरवर्षी तेच पक्षी तेथे जातात ह्याचे अुत्तर कोणी देअु शकेल ? त्यांच्या मध्ये अशी कोणती शक्ति आहे की , जिच्या योगे ते अगदी बरोबर सेबेरियातून अुडून त्या ठिकाणी जातात ? तीच गणेश शक्ति , आणि हीच गणेश शक्ति पृथ्वीच्या आत गुरुत्वाकर्षण शक्ति आहे तिला तुम्ही ग्रॅव्हीटी म्हणता आणि ज्या मनुष्या मधील ग्रॅव्हीटी खराब होते , जेव्हां त्यांच्यातील गुरुत्व खराब होते , जेव्हां त्याचा आत्मसन्मान दुर्बल होत जातो , जेव्हा त्याचे डोळे अिकडे तिकडे भिरभिरत असतात तेव्हा त्याचे मन खराब होते.तेव्हां त्याचे चित्त अिकडे तिकडे भरकटले जाते तेव्हा त्यची ग्रॅव्हीटी संपते. जेव्हां ही ग्रॅव्हीटी संपते तेव्हा काय होते तुमचे गणेश चक्र पकडले जाणे आणि जेव्हां गणेश चक्र पकडले जाते तेव्हां तुमच्यातला अिनोसन्स , अबोधिता संपते. तुम्ही चलाख होता. आता चलाखी पेक्षा जास्त मूर्ख पणा जगात दुसरा नाही. जो महामुर्ख असतो तो चलाखी करतो जो शहाणा असतो तो कधी करत नाही कारण चलाखी करून तुम्ही मिळवणार तरी काय ? चलाखी करुन तुम्ही तुमचा अिनोसन्स तर मिळवू शकत नाही की जे तुमच्या मध्ये गणेश शक्तिचे आहे ह्या गणेश शक्ती मुळेच तुम्ही जन्माला आला आहात. समजा तुमची अेक चेहरेपट्टी आहे , तुमच्या पत्नीची दुसऱ्या तऱ्हेची चेहरे पट्टी आहे आणि तुमचे जे मूल होअील ते दोघाच्याहि चेहऱ्याशी कसे मिळते जुळते होते हे कसे घडून येते. अेखाद्या शास्त्रज्ञाने हे बनवून दाखवावे अेखाद्या शास्त्रज्ञाने जमिनीतून दगड अुचलून त्याच्यातुन मुल बनवून दाखवाव. मुल सोडून द्या फूल काढून दाखवाव किंवा आणखी काहीहि बनवून दाखवाव. तर , माणसाला अेवढा कशाचा अहंकार झाला आहे अस म्हणतात की आपल्या शरिरामध्ये , कोणचीहि फॉरेन बॉडी किंवा बाहेरची गोष्ट आली तर आपले शरिर ते फेकून देते पण जेव्हां आअीच्या पोटामध्ये गर्भ असतो तेव्हां तो बाहेर फेकला जात नाही अुलट त्याचे संगोपन केले जाते त्याला संभाळलं जातं. जेव्हां त्याची योग्य स्थिती होताच त्याला बाहेर काढले जाते हे काम कोण करतं ? तुम्ही नाही का हे संभाळता ? तुम्हीच का जन्माला आला ? तुमचा जो काय आकार , चेहरा वगैरे आहे ही सर्व गणेश शक्तिची देणगी आहे. ह्या अज्ञानातून तुम्ही गणेश शक्ति नष्ट करत आहात. सकाळ पासून संध्याकाळ पर्यन्त ही गणेश शक्ति तुम्ही नष्ट करत आहात. जेथे , जेथे , गणेश शक्ती नष्ट झाली तेथे तेथे मुले जन्माला येणार नाहीत. तुम्ही अिंग्लंड मध्ये जा , जर्मनी मध्ये जा.सध्या ते म्हणताहेत कि स्थलांन्तर (अिमिग्रेशन) होणार नाही.परंतु त्यांना ते आवश्यक होअील कारण सर्व लोक साठ सर्षाचे म्हातारे होतील आणि मुले जर झाली नाही तर काय होणार ? जेथे विशेष करून स्त्रिया मधील आणि पुरुषा मधील सुध्दा गणेश शक्ति नष्ट होते तेथे मुले जन्माला येत नाहीतआणि ही गणेश शक्ति आपल्या मध्ये मुलाधार चक्रामध्ये स्थित आहे ह्या चक्र बद्दल शास्त्रामध्ये काहीहि लिहिले नाही.

आता लोक मला म्हणतात की माताजी तुम्ही जे सांगता ते कुठल्याहि पुस्तकात लिहिलेले नाही , पण जे पुस्तकात लिहिले आहे ते तर आहेच आहे आणि जर सर्व गोष्टी आधीच लिहिल्या असत्या तर येथे येअुन तुम्ही काय मिळविले असते. सांगण्यासाठी काही तरी शिल्लक ठेवावे लागतेच , आधी सांगुन सुध्दा त्याचा अुपयोग काय होणार होता ? त्याने नुकसानच झाले असते. जे आधीच सांगितले गेले त्याने लोकांचे पुष्कळ नुकसान झाले.प्रथम हे सांगितले होते की दारु पिअु नका कारण त्याने चेतना कमी होते. तुम्ही जरा अेक पिणे सुरु केले तर तुमचे नाभी चक्र खराब होअील अगदी सरळ आहे. कारण ज्या चेतनेच्या सहायाने तुम्ही

परमेश्वराचा शोध घेणार आहात , ती दबून जाते तुमच्या नाभी चक्रमध्ये जी चेतना आहे , जिचे योगे तुम्ही अुत्क्रांत झाले आहात, आमीबा पासून या स्थितीमध्ये आले आहात जर तुम्ही दारू पिअु लागलात तर ही अुत्क्रती थांबते तुम्ही अुत्क्रान्त होणार नाही तुम्ही पार होणार नाही म्हणून सांगितले की दारू पिअु नका. आता जर अेखाद्याला सांगावे की दारू पिअु नको , तर अितक्या टोकाला लोक गेले आहित , की अुमरखयाम साहेब होअुन गेले त्यांना लोक देवाच्या वर समजतात. आपले बच्छन साहेब मोठे कवी समजतात , त्यांच्या म्हणण्या प्रमाणे यात काय वाअिट आहे (Whats Wrong ? Whots Wrong ? Nohing is Wrong If you want to become strong there is notheing wrong.) काय बिघडले? काही बिघडले नाही जर तुम्हाला दगड बनायचे असेल तर काहि बिघडले नाही. तुम्ही जाअुन काहीहि खा , काहीहि प्या , हरकत आहे ? चुक काही नाही , बरोबर व चुक प्रश्नच येत नाही. तुमची अुत्क्रान्त होण्याची शक्ती संपून जाअील साधा सरळ हिशेब आहे. आता अेक टोक हे की , देवाच्या नांवानी पन्नास शिव्या , सगळ्या साधू संताच्या नांवानी पन्नास शिव्या आणि दूसरे टोक असे की जो दारु पितो त्याचे हात कापा , पाय कापा , डोके तोडा आता हा काय प्रकार झाला ? अेक अतिरेक असा की दारु पिणे ही फार मोठी बाब समजून त्याचेवर कविता लिहा , गझली लिहा, सगळे चालू आहे आणि दुसरा अतिरेक म्हणजे दारु पिणाऱ्याची मान तोडून टाका अेकदा दारु प्याला तर त्याची नशा अुतरवू शकेन , पण त्याची मानच जर तोडली तर मी काय करणार ? सगळे प्रमाणाबाहेर चालू आहे. तुमच्या आत अनेक चक्रे आहेत ज्यांच्या बद्दल सर्व काही सांगितले जाअील. माझ्या मते कोणत्याच चक्राबद्दल आपल्याला खास माहिती नाही असती तर मग आम्ही त्याचा असा खेळ केला नसता.

आपल्यातले तिसरे चक्र जे आहे ते अतिशय महत्वाचे आहे आणि दिल्ली शहरात त्या चक्रावर जास्त पकड आहे विशेषत: नवी दिल्ली मधे स्वाधिष्ठान चक्रवर जास्त पकड आहे व जुन्या दिल्लीत कमी. ज्याच्यामुळे आपण विचार करतो जेव्हां आपण जास्त विचार करु लागतो तेव्हां हे चक्र जास्त काम करते.या चक्रात अेक शक्ती असते जिच्यामुळे आपल्या पोटातील मेदाचे (Fat) रुपांतर मेंदूचे कार्यासाठी होत असते. आता , विचार करण्याची लोकांना अेक प्रकारची बिमारीच आहे , कधी कधी मला हे कळतच नाही की अेवढी काय जरुरी आहे विचार करण्याची. आता अेका माणसाला बाजारात जायचे आहे , मग पिशवी अुचला आणि जा , बघा काय भाजी मिळते आहे व ती घेअुन या पण सर्वात आधी घरी चर्चा सुरू की आज भाजी भेंडीची बनवायची का दुधियाची. बाजारात जाअुन बघितले तर दोन्ही भाज्या नाहीत. प्रथम घरात तासभर चर्चा झाली मग योजना तयार झाली आणि बाजारात गेल्यावर दोन्ही भाज्या मिळाल्या नाहीत. मग तिसरीच भाजी घेअुन आले जी बनविण्यासाठी काही सोयच नाही. घरात प्रत्येक बाबतीत विचार करुन करुन या लोकांनी काय करुन ठेवले आहे ते तरी सांगा ह्यालाच मी म्हणते गुंतत जाणे. अेक आधीचच गुंतणे आणि शिवाय वरुन लपेटून घ्यायचे.

आता हे सल्ला देणारे आले जसे म्हणतात ना अुंटावरचे शहाणे म्हणाले , की आम्ही तुम्हाला सल्ला दिला असता पण आम्ही अुंटावर बसलो आहोत. दुसरे म्हणाले खाली अुतरा तेव्हां त्यांनी सांगितले की , नाही आम्ही अुंटावरुनच सल्ला देणार. आता दुसरा प्रश्न आला की , सल्ला देणे बाजूलाच राहिले , पण यांना अुंटा संकट आत कसे घेअुन जायचे ही दूसरीच समस्या येअुन अुभी राहिली. म्हणजे , हे अॅडव्हाअिसर जनरल आले होते ते अुंटावर बसूनच जाणार होते आता ह्या अुंटावर बसणाऱ्यांचे काय करायचे. आता दुसरी गुंतागुंत प्रश्न असा होता की , अुंटावर बसवुनच त्यांना आता कसे घअुन जायचे तेव्हा म्हणाले की ठीक आहे जो मोठा दरवाजा आहे तो पाडून टाका म्हणजे त्याच्या मधून ते आत जाअू शकतील

तेव्हां हे महाशय सल्ला देण्यासाठी आत जाओी पर्यन्त जे प्रश्न होते ते लांबच राहिले आणि ह्यांनी मात्र सर्व पडझड करुन ठेवली , असे आमचे योजना बनविणे असते , असे आमचे विचार करणे असते. मुळ प्रश्नावर आमचे चित्त नसून भलतीकडेच भटकत असते. आता मुळ प्रश्न काय आहे ? मुळ प्रश्न हा की , आम्ही 'स्व' ला जाणले नाही. आम्हाला हे ठाऊक नाही की , आम्ही जगात का आलो हा पहिला भाग , दुसरा असा की , जे आम्हाला माहिती पाहिजे व ते कसे जाणून घ्यायचे हा मुळ प्रश्न आहे आणि त्याच्यासाठी आम्ही काय केल ? सूर्यावर गेलो. चंद्रावर गेलो , अिकडे गेलो , तिकडे गेलो , आणि मिळविलं काय हे समजून घेतले की , आपण काय आहोत ? ते सोडून बाकी सर्व आपण समजून घेतले. बाकी सर्व गोष्टीची माहिती झाली जसं सल्ला देण्यासाठी बोलविलेल्या त्या माणसाने सर्व नासधूस करुन ठेवली तसं आमचं हे सर्व विचार करणे , सकाळ पासुन संध्याकाळ पर्यन्त आमची नासधूस घडवून आणत आहे आणि आज अशा स्थितीला मनुष्य आला आहे , जेव्हां जेव्हा त्याची नजर माझ्याकडे वळते तेव्हां मला दिसून येते. पुर्वीचे काळात अेवढी विचार करण्याची सवय नव्हती. पूर्वी लोक शांत होते प्रत्येक बाबतीत विचार करीत नसत. बऱ्याचश्या गोष्टीचा स्विकार करीत असत.जसे जसे फक्त समोर येअील तसे तसे संस्कार करीत जात असत. आज काल फक्त विचार करणेच राहिले आहे. आणि लोक त्यांत अितके मग्न झाले आहेत की , क्षणभर सुध्दा त्यांना विचार थांबविणे जमत नाही. अेक क्षण सुध्दा त्यांचा विचार थांबत नाही. असे वाटते की , जशी काही विचारांची दोन शिंगे त्यांच्या डोक्यातुन वर येत आहेत , मला ती दिसतात आता त्यांची अवस्था अशी आहे.की , अेक मिनिट जरी विचार थांबविण्यास सांगितले तरी त्यांना ते जमत नाही.जसे काही विचारामध्ये ते वाहून गेले आहेत. विचारांनी त्यांना गिळून टाकले आहे. जे बाहेरचे आहेत , ज्यांना तुम्ही शिकलेले विचारी लोक समजता ते गेले आहेत आत आणि तुम्ही बाहेर आलात. शोधून सुध्दा तुम्ही स्वतःला मिळवूच शकत नाही. अतिशय विचार करण्याने सुध्दा स्वाधिष्ठान चक्र खराब होते. आता कोणी विचारले की माताजी विचार केल्याशिवाय कसे होणार ? हे कळत नाही की आधीच विचार करुन तुम्ही कांय मिळविणार आहात ? आधी विचार करुन जर काम होत असेल तर तिकडे जाण्यांची आवश्कताच काय आहे ?

समजा आपल्याला गांधी भवनला जायचे आहे. आता गांधी भवनला जायचे आहे तर आम्ही निघालो रस्त्यात चौकशी केली की कोणीकडे जायचे आणि पोचलो. आधीच विचार करायला लागलो की गांधी भवनला जायचे तर असे करावे की या बाजूने जाअून त्या बाजुकडे वळावे व मग तिकडे जावे. नाही तर अिकडूनच वळावे होता होता आणखी कोणी तरी म्हणाले की तिकडूनच गेलात तर चांगले होअील.असे तुम्ही निघा , चार माणसांना विचारा , म्हणजे पोचाल. आधीच गांधी भवनला कसे अेक तास घालविला आणि मग लक्षात आले की हिंडून फिरुन तुम्ही परत जागेवरच आलात , तिकडे गेलाच नाहीत. या चक्रात तुम्ही फिरत बसला आणि परत आलात अजून तुम्ही काही जाणलेच नाही , अजून तुम्हाला माहित व्हायचे आहे , अजून तुम्हाला पहायचे आहे जर काही माहितच नाही तर विचार कशाचा करायचा पुढे जाअून बघा काय होते ते. जेव्हां माणूस आपल्या बुध्दीने जाणून घेण्याच्या मनस्थितीत ठेवतो तेव्हांच तो त्याचे ध्येय गाठतो आणि ज्या व्यक्तिचे प्रथमपासूनच (Precondiioned Mind) आहे. ज्याने आधीच , अिश्वराचा अर्थ हा आहे. कुंडलिनीचा अर्थ हा आहे वगैरे. बरेचसे लोक तर असे म्हणतात की कुण्डलीनी पोटात असते मी म्हणाले "मी तर नाही बघितली" जर अेखादा येअुन माझे डोके खाअील की , आपले हृदय येथे नसून तेथे असते तर त्याला काय सांगणार ते जिथे असते तिथेच आहे.कमीत कमी बघा तर खर की खरोखर ती कुठे आहे. अश्या तऱ्हेने माणूस आपले तेच खरे मानत बसतो पुस्तकात जे काही लिहीले आहे तो काही शेवटचा शब्द (Last Word) नव्हे

की अंतिम सत्य नव्हे की ज्यांच्या पुढे काही तथ्य नाही. अस जर असतं तर तुम्ही संशोधन कशाचे करणार ?

तेव्हां माणसाच्या बुध्दिमध्येच संशोधन केले पाहिजे थोडसं शहाणपण असल पाहिजे. (Preconceived Idea) असु नये. (Open Mind) असावं. जर खुल्या मनाने तुम्ही बघाल तर सत्य तुम्ही लगेच आत्मसात कराल. आता आम्ही कुणाला सांगितल की तुम्ही तिथे जाव तिथे तुम्हाला घंटा घर दिसेल. ठिक आहे आम्ही घण्टा घर बघितल होत आणि त्यांनीहि त्याबद्दलच सांगितल आणि कदाचित असहि असेल की तुम्ही दुसऱ्या कुठल्या जागी पोहोचलात.

मुळे माणूस अितका कण्डीशन्ड होतो की त्याला हे समजवून घेणे अवघड होते की पुढे , जे सत्य आहे ते तुमचे समोरच प्रकाशित होणार आहे. आणि त्याचा आपण स्विकार केला पाहिजे. कारण त्याची बुध्दि अितक्या उच्च श्रेणीची होती की त्याच्याशी बोलायचे असल्यास पंचवर्णीय योजनावरच घोळावे लागते. दुसऱ्या कोठल्या विषयावर बोलूच शकत नाही म्हणून माणसाने आपला विचार असा ठेवला पाहिजे की बघु काय होते ते , जे पुढे येअील तेच होअील. बघु काय होअील ते होअील. कमीत कमी सहजयोगाबद्दल तरी तुम्ही असा विचार ठेवला पाहिजे जर आधी पासूनच तुम्ही काही वाचून आलात आणि मला काही प्रश्न विचारु लागलात तर त्याचे काही उत्तर मिळणार नाही. मला लोकानी असे प्रश्न विचारलेत की मला आश्चर्य वाटते म्हणून मला तुम्हाला हे सांगायचे आहे की प्रथम तुम्ही तुमच्या मनाला किंवा बुध्दिला हे सांगा की यावेळी तू जरा शांत हो आणि आता ह्या गोष्टीचा स्विकार कर. कारण चक्रे खराब करणें फार सोपे आहे पण त्यांना ठिक करणे अवघड आहे. स्वाधिष्ठान चक्र खराब झाल्यामुळे अनेक रोग होतात. आजारपण होतात हे बरे आहे कारण जर आजारपण झालेच नाही तर मनुष्य स्वतःला कधी ठीक करणारच नाही. आजारपणा शिवाय लोक हे समजुच शकत नाहीत की आत काही तरी खराब आहे. त्यांना फक्त रोगच माहिती आहे. बहुसंख्य लोक तर आजार ठीक करून घेण्यासाठीच येतात आता त्यांच्या हे लक्षात आले आहे की , आजारपणाशिवाय आणखी काही तरी अशुध्द किंवा खराब झाले आहे आणि त्याला ठीक करावयास हवे , पण ह्यापूर्वी तर फक्त रोग बरे करण्यासाठीच ते येत होते.

सर्वात प्रथम जो माणूस योजना करतो त्याला कोणते रोग होतात त्याला सर्व पोटाचे रोग होतात त्याचे यकृत (लिव्हर) जरुर खराब होते कारण लिव्हर सर्व विषांना आपल्या शरिराबाहेर काढून टाकते पण जरुरीपेक्षा जास्त विचार करणारा माणूस आपल्या स्वाधिष्ठान चक्राला अितका थकवितो की तो लिव्हरचा पर्वाच करत नाही आणि त्याची लिव्हर सशक्त होत नाही त्याच्या सर्व संवेदना व चेतना केवळ लैकर लैकर (Brain Call) बनवून मेंदूला पुरविणे व त्याला काबूत ठेवणे ह्यासाठीच झटत असतात. सर्व अिमरजन्सी केवळ मेंदू मध्येच येते आणि त्यासाठी लिव्हर निरुपयोगी होते. लिव्हरच्याकडे जातच नाही आणि ती खराब होते.

लिव्हर खराब झाल्यावर त्या माणसाला जेव्हां आजार होअील किंवा लिव्हर कॅन्सर होअील तेव्हांच ते डॉक्टरला कळेल आणि ते शास्त्रीय दृष्टिकोनातून तुम्ही किती दिवसात मराल येवढेच सांगतील. माझ्याकडे तर तसे सर्टीफिकेट घेअुन लोक आलेले आहेत आम्ही अेक महिन्यात मरणार आहोत असे आम्हाला सांगितले आहे परंतु झाले असे , की आमच्याकडे येअुन ते लोक ठीक झाले. वास्तविक तुमचे स्वाधिष्ठान चक्र खराब झाले होते आणि ते ठीक झाल्यावर तुमचा रोग पण ठिक झाला.

दुसरा अेक वाअीट रोग यामुळे होतो तो म्हणजे मधुमेह कारण हेच अेक चक्र सर्व ठिकाणी पुरवठा करते. तुमचे (Pancreas) खराब झाले आणि तुम्हाला मधुमेह झालाच लोक म्हणतात की मधुमेहावर अिलाज नाही असे अजिबात नाही कारण

तुम्हीच हा रोग ओढवून घेता आणि तुम्हीच तो बरा करता. आता तुम्हाला मधुमेह जर झाला तर लोक म्हणतात की शरीरातुन साखर बाहेर जाते. असे होते, तसे होते. पण कधी असा विचार केला आहे का की तुमच्या यकृतावर पराकाष्ठेचा ताण पडल्यामुळे त्याला संतुलनात आणण्यासाठी हा रोग झाला आहे. हा संतुलन देणारा रोग आहे कारण त्यामुळे माणसाच्या हे लक्षात येते की, त्याने संतूलन सोडून काम केले आहे. माणूस जेव्हां फार विचार करतो तेव्हां मधुमेहाचा आजार होतो. जे लोक जास्त विचार करीत नाहीत उदा.गांवात रहाणारे लोक, त्यांना कधी हा आजार होत नाही ते नेहमी पिष्टपम पदार्थ खात असतात. अेक कपात मगभर साखर घातली तरी ते गोडच लागेल. विशेषतः तुम्ही मेरठला जाल तर तुम्हाला असे वाटेल की त्यांनी प्रथम साखर विरघळून मग चहा बनविला आहे. चहा केला आहे असे वाटणारच नाही. ते तर साखरच करतात. तेव्हां अशा लेकांना सुध्दा कधी मधुमेह होत नाही. केव्हांहि बघा खेड्यातल्या लोकाना मधुमेह होत नाही. शहरातल्या लोकाना होतो कारण ते फार विचार करातात आणि विचार करुन करुन तरी काय केले. अणु बॉम्ब आणि तो बनवून त्याचे भूत डोक्यावर बसवून ठेवले आहे. आणि सर्व लोक घाबरत आहेत. अणुबॉब बनवण्याचा अेक फायदा मात्र जरुर झाला आहे की, सर्वाना आता समजले आहे कि, त्या मुर्खपणाचे हे फळ आहे. आता हा डोक्यावर बसलेला भूते जर बटण दाबतील तर आपण सर्व नष्ट होअु. मोठ्या हुशारीने हे जे त्यांनी बनविले आहे जे काही त्यानी संशोधन केले आहे त्या संशोधनामध्ये अशी व्यवस्था करुन ठेवली आहे की, अेका क्षणात सर्व जग नष्ट होअु शकेल आता सर्व लोक पश्चाताप करीत आहेत की, आपण हे काय करुन ठेवले आहे. हे आपल्या लक्षातच आले नाही की, संशोधन करुन करुन डोक्यावर आपण दारुगोळा भरुन ठेवला आहे. आपल्याच डोक्यावर दारु गोळा ठासून स्वतःचे नसलेल्या अवस्थेत असून मोठी मोठी पुस्तके सुध्दा निघत आहेत ह्या विषयावर की आता थोड्याच दिवसात जगाचा विनाश होणार आहे. आणि त्याची पूर्ण व्यवस्था ह्या लेकांनी करुन ठेवली आहे. ह्या सर्व अिश्वर विरोधी कारवाया आहेत. विचार करुन करुन हे जे तुम्ही बनविले त्यात विशेष काय मिळविले मला तर अजूनहि कळले नाही. आपला विचार जरा कमी करा, आणखी थोडा कमी करा परंतु नुसते बोलून ते होणार नाही नुसते विचार करु नका म्हणून ते होणार नाही. मी तर म्हणते की, तुमचा स्पीडोमिटर (वेग दाखविणारे यंत्र) जरा कमी चालवा ह्या बद्दल मी लोकांना सांगितले आहे आणि तुम्हाला पण सांगते. आपले जे (Spleen) आहे तेच स्पीडोमिटर आहे. मोठे विचार करणारे आणि लायक लोक आहेत ने, जेवता जेवता कोणच्यातरी विचारात तुम्ही पडणारच, स्वतःची लायकी दाखविण्यासाठी जेव्हां नअु वाजता जेवत असाल तेव्हां नेमक्या बातम्या येतात आणि त्या तुम्ही अैकणार जेव्हां तुम्ही जेवत असता तेव्हां सावकाश जेवले पाहिजे. तुमची बायको अेका बाजूने पंख्याचा वारा घालत असते आणि आरामात बसुन तुम्ही जेवत असता. अशा वेळी अेखाद्या दुर्घटनेचा समाचार येतो आणि तुमचे जेवण गेले कामातून आता त्याच्याच विचारात तुम्ही गाढून जाता. सकाळी नअु वाजता तुम्हाला कार्यालयात पोहोचायचे असते म्हणून लौकर आवरायचे असते. अेका हातात तुमची ब्रिफकेस असते, दुसऱ्या हातात छत्री असते आणि तुमच्या तोंडात काही तरी कोंबले जात असते ह्यातच तुमची धावपळ चालू असते. कोणीतरी तुमच्या मागे दूधाचा पेला घेअुन पळत असते तर अशा पध्दतीने तुम्ही खात असता. ह्यामुळे तुमचे जे स्पीडोमिटर आहे म्हणजे (Spleen) आहे ते वेडे होअुन जाते आणि त्यामुळे तुम्हाला रक्ताच्या कॅन्सरचा रोग होअु शकतो. आणि आम्ही कितीतरी रक्तच्या कॅन्सरचे रोग बरे केले. त्यांना डॉक्टरांनी सर्टिफिकेट दिले होते की अेका महिन्यांत ते मरतील ह्याचा अर्थ असा नाही की जगातले सर्व रक्ताच्या कॅन्सरचे रोगी घेअुन तुम्ही माझ्याकडे यावे.सांगण्याचा उद्देश असा की, तुमच्या स्पीडोमिटरच्या बंधनात तुम्ही कां अडकता? म्हणजे तुम्ही अुशीरा जावे हे पण

योग्य नाही. सर्वात महत्वाचा अर्थ हा की , तुमच्या आवाक्यात जितके आहे तेवढेच तुम्ही करावे. तुम्ही मानव आहात आणि यंत्र सुध्दा जेवढे कार्य करु शकत नाही तेवढे तुम्हाला का करायचे असते आणि करुन तरी तुम्ही काय मिळविले तर अणु बॉम्ब.

असे मोठे काय काम केले आहे तुम्ही ? मला माणसांना विचारायचे आहे की , ते फक्त येवढेच शिकले आहेत की , आपापसात कसे लढावे , कसे भांडावे , खुन कसा करावा , युध्दाच्या नावाखाली दुसऱ्या देशातील लोकांना कसे मारावे वगैरे. ही सर्व व्यवस्था केली आहे आणि ह्या शिवाय काय केले आहे ? कोणते सतकृत्य आतापर्यन्त तुम्ही केले आहे.म्हणाले आम्ही समाज कार्य केले आहे. तुम्ही मुर्ख आहात म्हणून तर समाज कार्याची आवश्यकता निर्माण झाली. जर प्रथमच मुर्खपणा केला नसता , जर लोकांना त्रास दिला नसता किंवा असे विचित्र , सर्वांना त्रासदायक रितिरिवाज बजवून ठेवले नसते तर समाजकार्याची आवशक्ताच नव्हती. याचा अर्थ असा की , जे धर्मात प्रस्थापित झाले आहेत त्यांना धर्म शिकवण्याची व अधर्माने वागू नका असे सांगण्याची जरूर नाही. जे धर्मातच आहेत त्यांना धर्म शिकविण्याची काय आवश्यकता आहे ?

हे चक्र , म्हणजे भवसागर किंवा व्हाइड (Void) आमचा धर्म दाखविते. आमचा धर्म मानव धर्म आहे आणि मानव धर्मात आमच्या मध्ये दहा गुण असणे आवश्यक आहे. जर हे दहा गुण आमचे मध्ये नसतील तर आपण मानवच नाही. अेक जनावर तरी आहेत किंवा सैतान आहेत. आमच्या मधील दहा धर्म या चक्राच्या चार बाजूस बांधलेले आहेत आणि मध्यभागी नाभी चक्र आहे.नाभी चक्रामध्ये या दहा धर्माच्या पाकळ्या आहेत धर्माकडे आमचे विशेष लक्ष असते.

आता धर्म म्हणजे , ख्रिश्चन , मुसलमान , हिन्दु वगैरे व अेकमेकाचे डोके फोडणे नव्हे. आम्हाला धर्माचा अर्थ अेवढाचा ठाऊक आहे की , ईकडून अेकजण आला , तिकडून दुसरा आला व मारामारी झाली , काय झाले ? धार्मिक कलह झाला. आमच्या सारख्या बेअक्कल लोकांना हे पण कळत नाही की धर्मा धर्मात कहल कसा होणार. कारण , ज्याची धारणा होते तो धर्म , ज्यामुळे मनुष्य असा बनतो , ज्याचे व्यक्तित्व असे होते की , ज्याला (Collective) अथवा सार्वजनिक , सामुहिक असे म्हणता येईल , असा होतो. ते कसे भांडणे करतील ? तुमची बोटे अेक दुसऱ्यांना मारतात का ? तुम्ही तसे बनता. तुमच्यामध्ये (Collectivity) सामुहिकता येते. ही धारणा मानवामधे होते ही धारणा जनावरात होत नाही. ही धारणा जेव्हा माणसात होते , धर्माची धारणा झाल्यावर हे धर्म आमचे मध्ये जागृत होतात त्यावेळी कुंडलिनी जागृत होउन चक्राचे भेदन करीत वर चढते तेव्हां मनुष्यामधे सामुहिक चेतना जागृत होते.

म्हणून मी सांगते की ही भाषण देण्याची बाब नाही. ही घटना आपोआप घडून येते. तुमच्यातील व दुसऱ्यातील दोष तुम्हालाच जाणवू लागतात. बाह्य दोष नाही की ते गृहस्थ नेहमी लाल रंगाचेच कपडे वापरायचे किंवा ते राजकीय नेत्या बरोबर असायचे आणि त्यांनी पक्ष बदलला वगैरे तुमच्या चक्रामध्ये कोणते दोष आहेत सुक्ष्मातले , तुमच्या तत्वामधले दोष कोणते आहेत ते तुम्हाला समजू लागतात. पार झाल्यावर तुमच्या मधील हे दोष तुमच्या तत्वामधील खराबी तुम्हाला माहित होतात. अेवढेच नव्हे तर सहजयोगामधे खोल अुतरुन जेव्हां तुम्ही ही विद्या पुर्णपणे शिकता ही निर्मल विद्या शिकता अथवा असे म्हणायला पाहिजे की त्याचे मास्तर होता तेव्हा तुम्ही अतिमानव संत होता. तुमच्यामधे धर्म जागृत होतो. तुमच्या चेतने मधे अेक नविन क्षेत्र (New Dimension) येते. तुम्हाला चैतन्य लहरी जाणवू लागतात. तुमच्या शारिरिक व मानसिक समस्या दुर होतात. म्हणुन आपल्याला हे लक्षात घेतले पाहिजे की , जो गुरु आपले आरोग्य ठीक ठेवू शकत

नाही , आपल्या आरोग्याचा जो सांभाळ करू शकत नाही अश्या गुरू कडे जाण्याची आवश्यकता नाही.

सहजयोगा मध्ये आपले आरोग्य कसे अुत्तम ठेवावे यात तुम्ही परंगत होता. तुमच्या चक्र मधील दोष कसे आहेत ते तुम्ही ठीक करु शकता कारण तुम्ही स्वतःच डॉक्टर होता. स्वतःच रोग निदान करता व स्वतःच औषधहि घेता.मनुष्यच सर्व काही आहे. मनुष्यामध्येच सर्व काही आहे जे काही तुम्हाला बाह्या मध्ये दिसते ते सर्व आत आहे.जसं तुम्ही येथे बसलेले आहात आणि तुम्हाला तुमच्या अेका नातेवाअीकाची तब्येत कशी आहे हे माहिती करुन घ्यायचे आहे त्यासाठी तुम्हाला टेलिफोन करावयाची , पैसे खर्च करण्याची काही आवश्यकता नाही. तुम्ही स्वतःच प्रकृती कशी आहे ते बघा ,तुम्हाला स्वतःलाच कळेल की कोणत्या चक्रावर पकड येत आहे. जर डाव्या बाजूला पकड येत असेल तर याचा अर्थ त्यांच्या मनावर दबाव आहे.आणि जर अुजव्या बाजूला असेल तर काहीतरी शारिरिक आहे. त्या नंतर कोणत्या चक्रावर बाधा आहे ते चक्रावरुन समजावून घ्या.जे कोड (Code) आहे तुम्ही ते समजावुन घेतले तर तुम्हाला ते लगेच कळेल की आता त्यांची परिस्थिती कशी आहे.येथे बसल्या बसल्याच तुम्ही त्यांना बंधन घाला व चैतन्य लहरी घ्या म्हणजे ते तेथे ठिक होअुन जातील. जेव्हा तुम्ही हे शास्त्र पुर्णपणे शिकाल तेव्हां तुम्ही हे सर्वकरु लागाल. असं होता कामा नये की , तुम्ही पार झालात सगळ्यांना सांगितलेत की माताजींनी आम्हाला पार केले आहे. घरी फोटो घेअुन गेलात आणि अेक वर्षानी भेटल्यावर सांगाल , "माताजी काय सांगायच आमची व्हायब्रेशनस पार गेली" आज पंतजींनी जे सांगितल ते खरं आहे लोक येथे येतात पार होअुन जातात पुनः सोडून देतात.चलती का नाम गाडी. माताजी आल्या , ते पार झाले , काम झाले ,परत आले तेव्हां जसे होते तसेच राहीलेसुन्हा पाहिल्या पासून सुरुवात "माताजी आम्हाला येथे पकडते ,तिथे पकडते ,असे झाले तसे झाले वगैरे.

हा अेक गंभीर विषय आहे. मजेचा नाही म्हणून मी तुम्हाला सांगते की , भारत वर्षात सर्व सोपे आहे , प्रत्येक गोष्ट मिळू शकते ही अेक अशी योग भूमी आहे , येथे मोठ मोठे अवतार होअुन गेले , मोठमोठ्या गोष्टी झाल्या.येथला सर्व प्रदेश (Vibrated) चैतन्य लहरीमय आहे अेक विशेष भूमी आहे म्हणून येथे लोक फार लवकर पार होतात. येथे जितके परदेशचे लोक आले आहेत त्यांच्यातील प्रत्येक व्यक्तिवर तीन तीन महिने मी हात झिजविले आहेत आणि तुम्ही आता येथे बसले आहात, थोड्या वेळातच बघा तुमच्या हाताना चैतन्य लहरी येतील. कदाचित अुद्याच्या सभेला तुम्ही येणार नाहीत. विचारले काय झाले , अुत्तर येअील , माताजी त्याचे असे झाले मला अेका ठिकाणी जायचे होते. धार्मिक काम होते तेव्हां नाही कसे म्हणणार मग जावे लागले.

या विषयाची गहराअी , गांभिर्य , विशेषतः महानता वगैरे आमच्या काही लक्षातच येत नाही. माझे हात तीन तीन महिने झीजविणाऱ्या या लोकांना हे समजते म्हणून तुम्ही लोक या मध्ये प्रस्थापित होण्या अैवजी , ते होतात आणि तुम्ही मात्र अुथळ पणाने हिंडत असता. तुमच्यात गहनता येत नाही.फारतर हे होअील की माझे पोट दुखत आहे ते ठिक करा किंवा माझ्या मुलाचे लग्न करुन द्या. आणखी काही नाही तर जरासे पुढे होअुन कानात सांगतील की , फुले घेअून आले आणि कानात सांगितले माताजी माझे आज्ञा चक्र पकडले आहे ते ठिक करा. " अरेपण का पकडले. कसे पकडले. याचा काही अभ्यास करीत नाहीत. मी तर नाही करणार , माझ्या पाशी वेळ नाही" अेक साधी गोष्ट आहे की , ध्यान झाल्यावर थोड्यावेळ पाण्यात पाय ठेअुन बसा आणि चैतन्यलहरी घ्या. आपल्यातील खराबी काढून टाका आणि स्वच्छ व्हा , रोज आंघोळ करता तसे या पध्दतीने रोज स्नान करा जर अेखाद्याने अेक दिवस स्नान केले नाही तर आपल्याला वाटते किती घाणेरडा माणूस आहे रोज स्नान करीत नाही. भारतीय लोकांची तर अशी अवस्था आहे

की , अेक दिवस स्नान करु नका सांगितले तर त्यांना वाटते तुरुंगात पाठविले. लंडन मध्ये जर तुम्ही सकाळी स्नान करुन बाहेर पडाल तर तुम्हाला खुप आजार होअु शकतील. विशेषतः फुफ्फुसाचा कॅन्सर होतो. मी अितक्या भारतीयांना हे सांगितले तर त्यांनी सहजयोग सोडून दिला आणि ते कॅन्सरनी मेले. परंतु मी जर त्यांना सांगितले की आत्म्याचे पण स्नान झाले पाहिजे. आपल्या आत्म जीवनाचे पण स्नान झाले पाहिजे तर तिकडे किंवा त्याच्या गांभीर्याकडे किंवा महानतेकडे कुणाचे चित्त राहात नाही.

तुम्ही अेक कथा अैकली असेल , अेका परिक्षेत जास्त गणिताचे प्रश्न येत होते. मला ते आता समजतात , तेव्हां समजत नव्हते 'अ' आला त्याने १/४ हिस्सा काम केले दुसरा आला त्याने १/१६ हिस्सा काम केले मग तिसरा आला त्याने अितके, अितके केले मग सगळे निघून गेले तर मग काम कधी संपणार ? कधी संपणारच नाही. जर तुम्ही अितक्या कामचूकार लोकांना कामावर ठेवले तर काम कसे होणार. पण माझ्या नशीबी असेच लोक आले आहेत. मला हे समजतच नाही. की , सहजयोगाचे काम पूर्ण का होत नाही. होणार कसे , लोक काम चुकार आहेत , तर काम कसे होणार.

मी सर्व द्यायला तयार आहे. सर्व शक्ती देण्यास तयार आहे परंतु त्यात टिकून राहणारे लोक पाहिजेत , अशा लोकांना आणा परंतू जे प्रश्न विचारले जातात त्यावरुन असे वाटते की , टिकणारे मुस्किलच आहेत. हे लक्षात घ्या की जे आपल्या हिताचे आहे ते पूर्ण गांभिर्याने मिळविले पाहिजे. जे घ्यायला पाहिजे ते घेतले पाहिजे प्रथम तर लोकांना कळतच नव्हत की घ्याव अस ह्याच्यात काही आहे परंतु जी जीवनासाठी फार महत्वाची गोष्ट आहे जी तुम्हाला समर्थ बनविते म्हणजे तुमच्या अर्थानुरुप तुम्हास बनविते. जिच्या शिवाय तुमचे जीवन पूर्णपणे व्यर्थ आणि निरर्थक आहे. तीच गोष्ट जर तुम्ही घेत नाही तर मला वाटते कमाल झाली. अगदी निरुपयोगी लोक आहात तुम्ही अितक्या समस्या आहेत व अितका अुथपळपणा आहे की , कोणत्याहि गोष्टीला महत्व देतच नाहीत. प्रत्येक बाबतीत हसण्यावरी नेणे. तुमच्या स्वतःची सुध्दा त्यामुळे हास्यास्पद स्थिती होत आहे. ज्यांना असे वाटते की सगळ्यांची टींगल करावी त्यांची स्वतःचीच हास्यास्पद परिस्थिती होते आणि अशा अेका अडचणीत तुम्ही स्वतःला टाकीत आहात की त्यातुन सुटणे अवघड आहे , फारच अवघड आहे.

सहजयोग अेक अशी गोष्ट आहे की , जी तुम्हाला द्यायची आहे. येथे काही द्यायचे नाही. फक्त घ्यायचे आहे. पण लोकांना हे कळत नाही जर कोणी देत आहे तर त्याचे महत्व लक्षात घेतले पाहिजे. जर मी तुम्हाला सांगितले की , अुद्यापासून येथे येण्यास शंभर रुपयाचे तिकिट पडेल तर बघा हा सर्व हॉल भरुन जाअील. जर येथे अेक पेटी ठेवली आणि तिच्यातर लिहिले की , "सेवे करीता" तर पेटी भरुन जाअीलच आणि शिवाय लोक पण जास्त येतील. येथे आल्यावर जर मी तुम्हाला नाम देअीन तर तुम्ही खुश व्हाल आणि म्हणाल , "वा आम्हाला नाम मिळाले. तुम्ही जर मुर्ख बनवायला निघालात तर लाखो लोक येतील. तर अशी परिस्थिती आहे. तुम्ही जर बघाल जे गुरु लोक आहेत , जे पैसा घेअुन पुढे आले आहेत त्यांनी काय काय मुर्ख पणाच्या गोष्टी पसरविल्या आहेत आणि त्यात लोक कसे अडकतात अेक गुरु दिल्लीला आले होते तर दिल्लीतील सर्व काम थांबले. लोक वेडे झाले आता त्यांच्या बद्दल सर्व काही बाहेर येत आहे. पण अेक काळ असा होता की , दिल्ली मध्ये रात्री कोणीहि बाहेर फिरु शकत नव्हते. तर असे होते

ते गुरु महाराज. अजब अजब नमुने आहेत काय सांगायचे तुम्हाला.

माझ्या सारख्या नवीन व्यक्तिपुढे हाच प्रश्न आहे.की ह्या सर्वाचे महात्म्य ह्या सगळ्यांना कसे सांगावे , अितकी महान व मौल्यवान गोष्ट आहे ही. जसं अेखाद्या माणसांनी कधी हीरा बघीतलाच नाही किंवा त्याचे मोल जाणलेच नाही अगदी खेडूत लोकसारखा तो आहे (खेड्यातले लोक फार हुशार असतात मी कोणाचे अुदाहरण देअु) अशा माणसापुढे तुम्ही हीरा नेअुन ठेवला , तर त्याल काय कळणार ? समजा अेका माकडा पुढे तुम्ही हिरा नेअुन ठेवला तर ते अेका फटक्यात हीरा अुडवून टाकेल की तुम्ही बघातच राहाल अशी परिस्थिती कधी कधी होते. हा हीराच नाही तर हीच फक्त सर्व मिळविण्याची गोष्ट आहे. ह्याच्या शिवाय आणखी काही नाही हे निश्चित आहे की मी सांगते त्याच्या पैकी साठ टक्के पुस्तकात मिळणार नाही. त्याचा तुम्हाला साक्षात्कार करुन घ्यायचा आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार करुन घ्यायचा आहे. आता ह्या वरुनच अेका महाशयांनी भांडण सुरू केले म्हणाले की तुम्ही म्हणाला होता बुध्दाचे स्थान येथे आहे. महावीराचे येथे आहे पण ते आम्हांला कसे कळणार ? मी सांगितले की , आहेत की नाहीत ते कळेल , पण आधी पार व्हा. जर नाही समजले तर तुमचे दूर्भाग्य हे तर मला असे विचारतात की मी कोणी खासदारच आहे. मी म्हणाले की मी जे सांगते आहे त्याची सत्यता तुम्ही ते जाणण्यास लायक झालात म्हणजे मी पटवून देअीन , प्रथम तुम्ही तो मिटवा जेथे बुध्द व महावीर आहेत ते तेथे आहेत की नाही हे पहाण्याची दृष्टी तुमच्यामध्ये आली पाहिजे. आधीच तुम्ही का प्रश्न विचारतां ? विद्यापिठात जाअुन तुम्ही कुलगुरुंना हे विचाराल का की कार्बन डाय ऑक्साअिड मधे कार्बन व ऑक्सिजन आहेत ते आधी सिध्द करा.ते म्हणतील तुमची अॅडमिशन रद्द केली आहे.

हे शिकण्याचे स्थान आहे , हे समजावून घेण्याचे स्थान आहे हे मिळविण्याचे स्थान आहे. येथे नम्रपणे घेतात , सर्व लोक मिळवितात आणि त्यात सखोलता मिळवितात आणि पुर्णपणे माहिती मिळवितात. हे मिळवूनच ते मोठे होअु शकतात. हे सर्व रोजच्या जीवनात कशा तऱ्हेने अमलांत आणायचे आहे , ते समजावून घेतात , गंगा वाहती आहे तुम्ही आपली घागर घेअुन या जेवढी घागर असेल तेवढे पाणी गंगा त्या मध्ये भरेल तेव्हां तुम्ही काय गंगेला प्रश्न विचाराल ? तसेच येथे गंगा वहात आहे आता साक्षात्कार होण्याचा समय आलेला आहे. ह्या देशात जोरात कार्य होत आहे. शहरात जरा हळू होते पण गावात फार जोरात होते. आम्ही अेका गांवात गेलो होतो तेथे ६००० लोक आले होते तेथे आम्ही अुभे राहिलो तेव्हां काही लोक आमच्या समोर काही अिकडे काही तिकडे असे होते असा सुंदर हॉल नव्हता. काही लोक मंदिरावर सुध्दा चढले होते पण सर्वच्या सर्व लोक पार झाले आणि त्यात प्रस्थापित झाले तिथे आता सहजयोगाचे केन्द्र पण सुरु झाले आहे असे होअु नये की , जितके बाहेरचे लोक आहेत ते अीश्वराच्या चाळणीतून खाली जातील आणि बाकीचे लोक मात्र तसेच राहतील म्हणून आपल्या अस्तित्वाला आपल्या गौरवाला प्राप्त व्हा. ते समजून घ्या आणि त्यांत सामावले जा ही समजून घेण्याची गोष्ट आहे. आज थोडीशी सुरुवात केली आहे अुद्या पुर्णपणाने हे तुम्हाला समजावून सांगिन.

॥ जय श्री माताजी ॥